रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८७ ▌अंक ३२१ ▌पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

रायगड, रविवार, दि. २८ एप्रिल २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## आज 'आघाडी'च्या सभांचा धडाका

**अलिबाग :** महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचारार्थ रविवारी (दि.२८) रोहा आणि श्रीवर्धन व पोलादपूरमध्ये इंडिया आघाडीची सभा आयोजित केली आहे. तालुक्यातील शेकापसह इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन तालुका चिटणीस यांच्याकडून करण्यात आले आहे. रायगड लोकसभा मतदार संघातील निवडणुकीची रणधुमाळी सुरु झाली आहे. येत्या ७ मे रोजी सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाच यावेळेत मतदान होणार आहे. मतदानासाठी दहा दिवस तर प्रचारासाठी अवघे आठ दिवस शिल्लक राहिले आहेत. प्रचाराचा वेगदेखील पान २ वर

## धैर्यशिल पाटलांची पुन्हा बोळवण?

### मोदींच्या फोल ठरलेल्या योजनांचा वाचला पाढा

**। पेण। विशेष प्रतिनिधी ।**

योग्य ठिकाणी वर्णी लावू, अशा आश्वासनावर भाजपाने पुन्हा एकदा धैर्यशिल पाटील यांची बोळवण केली आहे. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शब्द दिला असला, तरी त्याचे पालन होणार का? अशी साशंकता पाटील यांच्या समर्थकांमध्ये आहे.

त्यामुळे पेण येथील सभा केवळ पाटील यांची समजूत काढण्यासाठी आणि मोदी यांच्या फोल ठरलेल्या योजनांचा पाढा वाचण्यासाठी होती का, असा प्रश्न पेणमधील जनतेला पडला आहे. महायुतीकडून उमेदवारी मिळवण्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) सुनील तटकरे यशस्वी झाले. त्यामुळे खासदार होण्याचे स्वप्न पाहणाऱ्या धैर्यशिल पाटील यांच्यासह त्यांच्या समर्थकांना चांगलाच धक्का बसला होता. पान २ वर






# सत्तांतरासाठी आमदार खरेदी

## लातूरच्या सभेत प्रियंका गांधी यांचा घणाघात

**। लातूर । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रात पैशाच्या जोरावर आमदार विकत घेतले. तुमच्या डोळ्यादेखत निवडून आलेलं सरकार पाडलं. ज्या आमदारांना तुम्ही मत दिलं, ते आमदार पक्षांतर करत आहेत. तुमच्या डोळ्यादेखत हा गुन्हा होतोय. लोकशाहीची हत्या केली जातेय. आपल्या पूर्वजांनी स्वतंत्र भारतासाठी, लोकशाहीसाठी लढा दिला. मात्र, आज लोकशाहीच दिसत नाही. संविधान बदलण्याची भाषा केली जातेय. हे सरकार संधी मिळाल्यास हे संविधान बदलून टाकतील. संविधानाची ताकद कमी करतील. यासह इलेक्ट्रोल बाँडचा संदर्भ देत, मोदी सरकारने मोठा घोटाळा केल्याचे सांगत प्रियंका गांधीं यांनी मोदी सरकारचा समाचार घेतला.

काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांची शनिवारी (दि.२७) उदगीरमध्ये सभा झाली. यावेळी त्या बोलत होत्या. मोदींनी रोजगार दिला का, महागाई कमी केली का, असा सवाल प्रियंका गांधींनी उपस्थित केला. हाथरस, उन्नाव, मणिपूर आणि कुस्तीपटूंचा दाखला देत महिलांवर होत असलेल्या अन्यायावरुन सवाल उपस्थित केले. देशात महिलांवर अत्याचार होत असून अत्याचार करणाऱ्यांना पाठिशी घालण्यात येत असल्याचं प्रियंका गांधींनी म्हटले.



### दर्जा घसरला

आजपर्यंत अनेक पंतप्रधान झाले. त्यापैकी काही घरातलेच होते. मात्र मनमोहन सिंह, अटलबिहारी वाजपेयी यांनादेखील जवळून पाहिले. या सर्व पंतप्रधानांचे वक्तृत्व, त्यांचे विचार हे सर्वसामान्यांच्या हिताचे होते. मात्र आज आपल्या देशाचे पंतप्रधान पातळी सोडून महिलांच्या मंगळसुत्राची राजकीय पक्षाकडून चोरी होणार असल्याचं सांगत आहेत. मुस्लिम बांधवांच्या मुलांबाबत प्रश्न उपस्थित करीत आहेत. पंतप्रधानपद सांभाळताना दर्जा टिकविणं महत्वाचं आहे. मात्र आपले पंतप्रधान पातळी सोडून बोलत आहे, ही चिंतेची बाब असल्याचं मत काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी लातूरच्या सभेत व्यक्त केलं.

### उद्योगपतींना कर्जमाफी, शेतकऱ्यांचं काय?

रोजगार, महागाई, महिलांसाठी विविध योजनांचा दाखला देत प्रियंका गांधींनी मोदी सरकारवर हल्लाबोल केला. मोदी सरकारने १६ लाख कोटी रुपयांची माफी बड्या उद्योगपतींना केली. मात्र, शेतकऱ्यांसाठी काय केलं?, असा सवाल प्रियंका गांधींनी विचारला. देशात ७० कोटी युवक बेरोजगार असून ३० लाख जागा गेल्या १० वर्षांत मोदींनी भरल्याच नाहीत. महागाईने सर्व महिला भगिनी त्रस्त झाल्या आहेत. गॅस सिलेंडर ११०० ते १२०० रुपयांवर पोहोचला होता. मात्र, निवडणुकी जवळ आल्या की सिलेंडरचे भाव कमी केले. महिलांसाठी सरकारकडून काहीही मिळत नाही, देशात किती शेतकऱ्यांनी आत्महत्या केली, सोयाबीनच्या शेतकऱ्यांचे काय हाल आहेत. शेतीच्या प्रत्येक मालावर जीएसटी लावण्यात येत आहे, असे म्हणत प्रियंका गांधींनी मोदी सरकावर हल्लाबोल केला.




## वेधक

### आरोपीची पोलीस कोठडीत रवानगी

**अलिबाग :** मजुरीचे पैसे देण्याच्या वादावरुन कामगार महिलेचा खून करणाऱ्या इसमाला मांडवा पोलिसांनी शुक्रवारी (दि.२६) सकाळी अटक केली असून, त्याला न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याला २९ एप्रिलपर्यंत चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. मल्लिकार्जुन असे या खुनी आरोपीचे नाव असून, तो मेस्त्री म्हणून किहीम येथे घराचे बांधकाम करीत होता. मल्लिकार्जुन सोबत कामगार म्हणून कमलीबाईदेखील काम करीत होती. या कमलीबाईने गुरुवारी मल्लिकार्जुनकडे कामाचे राहिलेले मजुरीचे पैसे मागितले होते. त्यावरुन मल्लिकार्जुनने कमलीबाईच्या डोक्यात कोणत्यातरी साहित्याने वार करून तिला ठार मारले. याप्रकरणी मल्लिकार्जुन याच्याविरोधात मांडवा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

## महामार्गावर प्रवाशांची कोंडी

**। कोलाड । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर कोलाड-इंदापूर व माणगावदरम्यानच्या चौपदरीकरणाचे काम अद्यापही अपूर्णावस्थेत असल्यामुळे येथे वाहनांच्या लांबच-लांब रांगा लागत आहेत. यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होत असून, यामुळे प्रवाशांचा खोळंबा होताना दिसत आहे. यामुळे वाहने तासन्तास उभी करावी लागत असून, प्रवाशांना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे.

शनिवार व रविवार नोकरदारांना असणाऱ्या सुट्ट्या व शालेय विद्यार्थ्यांना पडलेल्या सुट्ट्या, तसेच सुरु झालेली लग्नसराई यामुळे महामार्गावरील वाहनांची पान २ वर



- **वाहनांच्या लांबच लांब रांगा**
- **प्रचंड उकाड्याने प्रवासी हैराण**

## अपघातात एकजण गंभीर

**। सुकेळी । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गावरील गोडसई गावाच्या हद्दीमध्ये फॉरच्युनर कार व कंटेनर यांच्यात भीषण अपघात झाला असून, कारचालक गंभीर जखमी झाला आहे. हा अपघात शनिवारी (दि.२७) पहाटेच्या सुमारास झाला. पान २ वर




## बंद शाळा पुन्हा उघडणार

### रंगरंगोटी, दुरुस्तीच्या कामांना वेग



**। अलिबाग । प्रमोद जाधव ।**

पटसंख्येअभावी बंद केलेल्या शाळांचे दरवाजे पुन्हा उघडणार आहेत. जिल्ह्यातील बंद पडलेल्या जिल्हा परिषदेच्या सुमारे दीडशे शाळा ७ मे रोजी मतदानाच्या दिवशी पुन्हा उघडणार आहेत. त्यापैकी अनेक शाळांची पडझड झाली आहे. त्या शाळा दुरुस्तीसह रंगविण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

पटसंख्येअभावी जिल्ह्यातील अनेक शाळा बंद पडल्या आहेत. २०१९ नंतर गेल्या पाच वर्षांत शाळा बंद असल्यामुळे दुरूस्तीकडे कोणी लक्ष दिले नाही. त्यामुळे त्या शाळांची अवस्था अतिशय बिकट झाली आहे. या शाळांची गरज मतदानाच्या दिवशी आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पोलादपूर, माणगाव, खालापूर, मुरुड, रोहा, पेण, महाड, म्हसळा, सुधागड, श्रीवर्धन, तळा, पनवेल, कर्जत, उरण तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या १६० हून अधिक शाळा पटसंख्येअभावी बंद पडल्या आहेत. पान २ वर

> पटसंख्येअभावी बंद पडलेल्या शाळा मतदान केंद्र म्हणून घेतल्या आहेत. वरिष्ठांच्या सूचनेनुसार त्या शाळा दुरुस्ती व रंगविण्याचे काम केले आहे. त्याचे कामदेखील युद्धपातळीवर सुरू आहे. त्याठिकाणी असलेल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचे कामही केले जात आहे.
>
> – विक्रम पाटील, तहसीलदार




## अखेर कांद्यावरील निर्यातबंदी उठवली

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

कांदा निर्यातबंदीवरुन शेतकऱ्यांसह विरोधी पक्षांनी मोदी सरकारला धारेवर धरले होते. त्यातच गुजरातमधील दोन हजार मेट्रिक टन पांढरा कांदा निर्यातीला मोदी सरकारने परवानगी दिल्यानंतर शेतकरी आणि विरोधी पक्षांनी संताप व्यक्त केला होता. अखेर मोदी सरकारला झुकावं लागलं असून, कांदा निर्यातबंदी उठवली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील कांदा उत्पादकांना दिलासा मिळाला आहे.

**शेतकरी, विरोधकांपुढे मोदी सरकार झुकले**



केंद्र सरकारने ९९ हजार १५० मेट्रिक टन कांदा निर्यातीस परवानगी दिली असून, बांगलादेश, यूएई, भूतान, बहरीन, मॉरिशस आणि श्रीलंका या सहा देशांमध्ये कांदा निर्यात केला जाणार आहे. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

महाराष्ट्रातील लाल कांद्याला निर्यातबंदी असताना गुजरातच्या पांढऱ्या कांद्याची निर्यात केंद्र सरकारने खुली केली होती. त्यानंतर विरोधकांनी या मुद्द्यावरून केंद्र सरकारवर हल्लाबोल केला होता. दरम्यान, शनिवारी केंद्र सरकारने परवानगी दिली आहे. राष्ट्रीय बाजारपेठेत पान २ वर

### गेल्यावर्षी केली होती निर्यातबंदी

केंद्रातील मोदी सरकारने गेल्या वर्षी ८ डिसेंबर २०२३ ला कांदा निर्यातबंदी केली होती. ही निर्यातबंदी ३१ मार्चपर्यंत असेल असं म्हटलं होतं. ३१ मार्चनंतरही कांदा निर्यातबंदी कायम राहिली. शेतकऱ्यांचा वाढता दबाव आणि विरोधी पक्षांनी हा मुद्दा सातत्याने उचलून धरत केंद्र सरकारला धारेवर धरलं होतं. यामुळे अखेर मोदी सरकार झुकलं आणि कांदा निर्यातबंदी उठवण्यात आली.






# मोदींना पुन्हा संधी देणं धोकादायक

## सांगोल्याच्या सभेत शरद पवारांची टीका

। सांगोला । प्रतिनिधी ।

शुक्रवारी लोकसभेच्या निवडणूकीचा दुसरा टप्पा पार पडला. तर दुसरीकडे उर्वरित टप्प्यांसाठी प्रत्येक पक्षाकडून प्रचार सुरु आहे. अशातच शुक्रवारी महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी सभा घेतली. यावेळी पवारांनी या सभेमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीकास्त्र सोडलं आहे. नरेंद्र मोदींना पुन्हा निवडून देणं धोक्याचं असल्याचं शरद पवार यांनी म्हटलंय. या सभेत बोलताना शरद पवार म्हणाले की, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी शिक्षण क्षेत्रात खूप काम केलं. त्याशिवाय त्यांनी आरोग्याचा दर्जा देखील सुधारण्यासाठी काम केलं. मात्र आत्ताच्या सरकारने दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांना तुरुंगात टाकलं आहे. मोदींच्या विरोधात केजरीवाल बोलले म्हणून त्यांना तुरुंगात जावं लागलं. हे पाहून आम्हाला लक्षात आलं की मोदी देशात हुकूमशाही आणणार आहेत.



पवार यांनी पुढे सांगितलं की, काही दिवसांपूर्वी परदेशी लोकांशी माझी भेट झाली. त्यावेळी मी त्यांना इथे का आलात असा प्रश्न केला असता, त्यांनी मला सांगितलं या देशात लोकशाही टिकणार की नाही हे बघण्यासाठी आलो आहोत. त्यामुळे ही निवडणूक सोपी नसणार आहे. नरेंद्र मोदींना पुन्हा संधी देणं धोकादायक आहे.या सभेमध्ये शरद पवार यांनी शेतीविषयीच्या प्रश्नांवर देशील भाष्य केलं. शेती व्यवसायाला जागतिक बाजारात भाव मिळत नाहीये. असं असताना निर्यातीला बंदी घालण्याची भूमिका या सरकारने घेतली. देशात सगळ्यात जास्त उसाचे उत्पन्न आणि दुधाचे उत्पन्न महाराष्ट्रात होत आहे. तरीही जागतिक बाजारातली व्यवसायाची संधी डावलून शेतकऱ्याचे नुकसान हे सरकार करतंय, असं शरद पवारांचं म्हणणं आहे.

गेल्या अडीच वर्षांमध्ये लोकशाहीची एकही निवडणूक झालेली नाही. पंचायत समिती जिल्हा परिषद नगरपालिका असेल, या निवडणुका सरकारने होऊ दिल्या नाहीत. देशात हे हुकूमशाहीचं सरकार परत येऊ द्यायचे नसेल तर महाविकास आघाडीच्या उमेदवारांना निवडून द्या, असं आवाहन पवार यांनी केलं आहे.

# राजन विचारेंकडून शक्तीप्रदर्शनाची तयारी

। ठाणे । प्रतिनिधी ।

ठाणे लोकसभा मतदारसंघ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मिळेल हे जवळपास स्पष्ट असले तरी पक्षाकडून कोणाला उमेदवारी मिळेल याविषयी अजूनही संभ्रम कायम आहे. उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहिलेले राजन विचारे यांनी मात्र, महिनाभरापासूनच प्रचार सुरू केला आहे. ठाणे लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी अर्ज भरण्यास आजपासून सुरुवात करण्यात आली. दरम्यान, राजन विचारे हे येत्या सोमवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. विचारे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी शिवसेना नेते आदित्य ठाकरे उपस्थित राहण्याची शक्यता असून शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात हे शक्तिप्रदर्शन करायची तयारी ठाकरे गटात केली जात आहे.



ठाणे लोकसभा मतदारसंघाचा भाग असलेला नवी मुंबई, ठाणे आणि मीरा-भाईंदर भागातून नेते पदाधिकारी तसेच कार्यकर्त्यांना सोमवारी ठाण्यात उपस्थित राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांच्या टेंभी नाका येथील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून त्यानंतरच विचारे आपला उमेदवारी अर्ज दाखल करण्यास पुढे जाणार आहेत.

ठाणे लोकसभा मतदारसंघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जातो. शिवसेनेत फूट पडल्यानंतर खा. राजन विचारे हे उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहिले. विचारे यांना ठाकरे गटाकडून ठाणे लोकसभेची उमेदवारी जाहीर झाली आहे. महायुतीमध्ये शिवसेनेकडे ही जागा गेली असल्याची चर्चा आहे. शिवसेनेकडून उमेदवाराबाबत अनिश्चितता आहे. त्यामुळे महायुतीच्या उमेदवाराबाबत अद्यापही संभ्रम आहे.

२९ एप्रिल या दिवशी ते उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्यापूर्वी ते जोरदार शक्तीप्रदर्शन करणार आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यात शक्तिप्रदर्शन करायची तयारी ठाकरे गटात केली जात आहे.

## वे|ध|क

### पटोलेंची शिंदेंवर टीका

**मुंबई :** गद्दारी करुन सत्ता मिळवणाऱ्यांना राहुल गांधी, गांधी कुटुंबाचा त्याग, बलिदान काय कळणार, असा पलटवार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केला. मीडियाशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनी भाजपाच्या मदतीने बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना फोडून गद्दारी केली. भाजपाच्या मदतीने सुरत व तेथून गुवाहाटीला जाऊन महाविकास आघाडीचे सरकार पाडले. ईडी कारवाईच्या भितीने गद्दारी करून पक्ष चोरणाऱ्यांनी काँग्रेस व राहुल गांधी यांच्याबद्दल बोलू नये. भाजपाच्या वळचणीला गेलेल्या एकनाथ शिंदे यांनी काहीही केले तरी त्यांच्या कपाळावरचा गद्दारीचा शिक्का कधीही पुसला जाणार नाही, या शब्दांत नाना पटोलेंनी सडकून टीका केली.

### रोहिणी खडसेंचा सभांचा धडाका

**पुणे :** पुणे जिल्ह्यातील शिरूर लोकसभा मतदारसंघात डॉ. अमोल कोल्हे व शिवाजीराव अढळराव पाटील यांच्यात होत असलेल्या सामन्यात मुक्ताईच्या लेकीने डॉ. कोल्हे यांच्या प्रचारार्थ खानदेशातील रहिवास भागात प्रचाराची धुरा हाती घेतली आहे. ॲड. खडसे यांनी शिरूर मतदारसंघात शिक्रापूर येथे डॉ. कोल्हे यांच्या प्रचारार्थ धडाकेबाज बॅटिंग सुरू केली आहे. सत्ताधाऱ्यांच्या चुकीच्या धोरणांमुळे देशासमोर महागाई, बेरोजगारी, महिला, शेतकऱ्यांचे प्रश्न गंभीर बनल्याचा घणाघात ॲड. रोहिणी खडसे यांनी केला. एकीकडे त्यांचे वडील ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे भाजपत परतत असताना कन्या रोहिणी यांनी आपल्या भूमिकेवर ठाम राहत शरद पवारांसोबत राहण्याचा निर्धार तर केलाच, शिवाय आपल्या पदाला न्याय देत पक्षाच्या उमेदवारांसाठी त्या राज्यभर दौरे करीत आहेत.

### उमेदवारी अर्जांची विक्री

**मुंबई:** लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजल्यापासून महिनाभराने महामुंबईत आता खऱ्या अर्थाने मतसंग्रामाला सुरुवात झाली आहे. महामुंबईतील १० लोकसभा मतदारसंघांत शुक्रवारपासून उमेदवारी अर्जांच्या विक्रीला सुरुवात झाली. मुंबई शहर, उपनगरे, ठाणे, कल्याण, भिवंडी आणि पालघर या मतदारसंघांतून एकूण ३८९ उमेदवारी अर्जांची विक्री नोंदविली गेली. पालघरमधून एक तर कल्याणमधून दोघांनी अर्ज दाखल केले. बहुतांश उमेदवार सोमवारनंतर उमेदवारी अर्ज दाखल करतील, अशी अपेक्षा आहे.म्हणून कोटेचा यांनी भरले तीन अर्ज कुठल्याही कारणाने अर्ज बाद होवू नये म्हणून मिहीर कोटेचा यांनी तीन उमेदवारी अर्ज भरले आहे. तर, सुषमा मौर्य यांनी अपक्ष म्हणून अर्ज भरला आहे.पारंपरिक कोळी नृत्य, जोडीला मराठमोळा लूक अशा थाटात उत्तर-पूर्व लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार मिहीर कोटेचा यांनी शुक्रवारी उमेदवारी अर्ज दाखल केला.

# ‘देशातील लोकशाही, पुरोगामी विचार धोक्यात’

। कोल्हापूर । प्रतिनिधी ।

देशातील परिस्थिती पाहता घटना लोकशाही, पुरोगामी विचार धोक्यात आले आहेत. कोल्हापूरची पुरोगामी विचारधारा वाढीस लागण्यासाठी शाहू महाराज यांना संसदेत पाठवावे, असे आवाहन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केले. कोल्हापुरातील काँग्रेसचे उमेदवार शाहू महाराज छत्रपती यांच्या प्रचारार्थ फुलेवाडी येथे जाहीर सभा घेण्यात आली. ही निवडणूक देशाच्या भवितव्याची आणि लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणासाठी अत्यंत महत्वाची आहे. त्यामुळे आपण सर्वांनी इंडिया आघाडीच्या व काँग्रेसच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी समवेत व्यासपीठावर कोल्हापूर लोकसभेचे उमेदवार शाहू



छत्रपती महाराज, आमदार पी. एन. पाटील आदींसह महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी आमदार थोरात म्हणाले, माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी देशाची अर्थव्यवस्था बळकट केली. मोदी सत्तेत आल्यानंतर जातीभेद वाढला. देशाची लोकशाही, राज्यघटना, मताचा अधिकार संकटात आहे. ते टिकवण्यासाठी परिवर्तन गरजेचे आहे. शाहू छत्रपती यांना मत म्हणजे राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांना मत आहे. उमेदवार शाहू महाराज म्हणाले, कोल्हापूरला मुबलक पाणी, रंकाळा संवर्धन, महिलांना न्याय, तरुणांना रोजगार अशा बाबींवर निवडणूक लढवत आहोत. लोकांना हवे असलेले परिवर्तन या निवडणुकीत झाल्याशिवाय राहणार नाही.आ. सतेज पाटील यांनी श्रीमंत शाहू महाराजांच्या रुपाने छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती शाहू महाराजांचा विचार दिल्लीत जाणार आहे. विरोधी उमेदवाराने पाच वर्षांत काय काम केलं, किती लोकांच्या भेटी घेतल्या, किती निधी आणला, हे त्यांनी सांगावे, असे आव्हान त्यांनी दिले.

# मुंबई उत्तर मध्यमधून उज्ज्वल निकमांना उमेदवारी

**मुंबई :** भाजपने मुंबई उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघातून विद्यमान खासदार पूनम महाजन यांचा पत्ता कट केला आहे. भाजपने या मतदारसंघातून उज्ज्वल निकम यांना उमेदवारी जाहीर केली आहे. या मतदारसंघातून महाविकास आघाडीकडून वर्षा गायकवाड यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यामुळे उत्तर मध्य मुंबईत वर्षा गायकवाड विरुद्ध उज्ज्वल निकम अशी लढत पाहायला मिळणार आहे. महाविकास आघाडीकडून दोनच दिवसांपूर्वी काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांना उत्तर मध्य लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. त्यामुळे भाजप वर्षा गायकवाड यांच्याविरोधात कोणाला उमेदवारी देते याची उत्सुकता होती. विद्यमान खासदार पूनम महाजन यांना पुन्हा संधी दिली जाते की नव्या चेहऱ्याला संधी दिली जाते याबाबत चर्चा सुरू असताना आशिष शेलार यांचे नाव देखील समोर आले होते. दरम्यान, कालच उद्धव ठाकरे यांनी वर्षा गायकवाड यांना निवडून आणण्यासाठी पूर्ण ताकद लावणार असल्याचे म्हटले होते.

# ‘विचारे ठाण्यात मताधिक्याने जिंकतील’

। ठाणे । प्रतिनिधी ।

महाराष्ट्रातील काही मतदारसंघात महायुतीचे उमेदवार अद्याप जाहीर झालेले नाही. उमेदवारी जाहीर न झालेल्या मतदारसंघांमध्ये मुंबईजवळील ठाणे लोकसभा मतदाररसंघाचाही समावेश आहे. ठाण्यामध्ये महायुतीची बऱ्या पैकी ताकद आहे. मात्र, या मतदारसंघावर शिवसेना शिंदे गट आणि भाजपा या दोघांकडूनीह दावा करण्यात येत असल्याने येथील तिढा अद्याप सुटलेला नाही. दरम्यान, ठाण्यातील लोकसभेच्या जागेवरून शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी महायुतीला टोला लगावला आहे. इथे साक्षात नरेंद्र मोदी यांनी उमेदवारी अर्ज भरला तरीसुद्धा ही जागा राजन विचारे हे मोठ्या मताधिक्याने जिंकतील, असे सुषमा अंधारे यांनी म्हटले आहे. ठाणे लोकसभा मतदारसंघातील जागेवरून महायुतीमध्ये निर्माण झालेल्या तिढ्यावरून टोला लगावताना सुषमा अंधारे म्हणाल्या की, काय तो एकदा उमेदवार ठरवून टाका. मात्र माझ्या माहितीप्रमाणे ठाण्याची जागा ही त्यांना मिळत नाही आहे, असं काहीसं चित्र आहे. त्यामुळे ज्यांची जागा निश्चित नाही, ज्यांचा उमेदवार निश्चित नाही. त्यांनी इथे येऊन विजयाच्या बाता मारणं हे आश्चर्यकारक आहे. आम्ही आधीही म्हटलंय आणि आताही सांगतोय, इथे साक्षात नरेंद्र मोदी यांनी उमेदवारी अर्ज भरला तरीसुद्धा ही जागा



राजन विचारे हे मोठ्या मताधिक्याने जिंकतील,असा आम्हाला विश्वास आहे. यावेळी सुषमा अंधारे यांनी शिवसेना शिंदेगटावरही टीका केली आहे. त्या म्हणाल्या की, असली नकलीचा काहीतरी खेळ सुरू आहे. मला वाटतं या निमित्ताने नकली लोक फार लवकर उघडे पडतात. कारण नकलींना दिल्लीत मुजरे आणि हुजरे केल्याशिवाय त्यांचं काहीच ठरत नाही. असो, काहीही असलं तरी जे दोन-तीन लोक कोट शिवून तयार आहेत. त्यातल्या कुणाला तरी सांगावं की तुमचे कोट नेटफ्लिक्सवर विकायची वेळ आली आहे, असा टोलाही सुषमा अंधारे यांनी लगावला. दरम्यान, ठाणे लोकसभा मतदारसंघामध्ये ठाकरे गट आणि महाविकास आघाडीकडून प्रचाराचा धुरळा उडताना दिसत आहे, तर अद्याप उमेदवार जाहीर न झाल्याने महायुतीचे कार्यकर्ते अस्वस्थ झाले आहेत, लवकरात लवकर उमेदवार जाहीर करा, अशी मागमी कार्यकर्त्यांकडून केली जात आहे. दरम्यान, महायुतीचा उमेदवार २ मे रोजी जाहीर होणार असल्याचे सांगितले जात आहे.

# सहा गावांत शून्य टक्के मतदान

। नशिक । वृत्तसंस्था ।

लोकसभा निवडणुकीत सर्वत्र मतदान होत असताना मेळघाटातील सहा गावांमध्ये शून्य टक्के मतदान झाले. धारणी तालुक्यातील या गावांनी मतदानावर बहिष्कार टाकला होता. त्यासंदर्भात प्रशासकीय यंत्रणेने त्यांची मनधरणी सुद्धा केली. परंतु, शुक्रवारी मतदानाच्या दिवशी एकही मतदाता फिरकला नाही. धारणी तहसील अंतर्गत ग्रामपंचायत रंगूबेली आहे. त्याअंतर्गत रंगुबेली, कुंड, धोकरा, खामदा, किन्हीखेडा, खोपमार ही गावे आहेत. या गावांमध्ये महावितरणची वीज, पिण्यासाठी शुद्ध पाणी, पक्के रस्ते, आरोग्य सेवा केंद्र आदी सुविधा नाहीत. कोणी आजारी पडले, तर त्याला खासगी दवाखान्यात न्यावे लागते, गावात जाण्यासाठी रस्ता नाही. त्यामुळे एकही वाहन जाऊ शकत नसल्याने नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, ग्रामसेवक तथा महसूल व ग्रामविकास यंत्रणेने त्यांची मतदानासाठी मनधरणी केली होती. मात्र ते ठाम राहिले. दोन हजार मतदाते सहा गावांमध्ये सुमारे दोन हजार मतदार असून लोकसभा निवडणुकीत कोणीही मतदान करणार नाही, असा सर्वांनी एकमताने निर्णय घेतल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# सातिर्जे पुलावरून पाण्याचा टँकर कोसळला

## अपघातात टँकर चालकाचा मृत्यू; एक गंभीर जखमी

। सोगाव । वार्ताहर ।

अलिबाग तालुक्यातील आगरसुरेफाटा ते सातिर्जेकडे जाणाऱ्या रस्त्यावरील पुलावरून पाण्याने भरलेला टँकर पुलावरून खाली कोसळून अपघात घडला. घडलेल्या अपघातात टँकर चालकाचा मृत्यू झाला तर टँकर मालक गंभीर जखमी झाला. शुक्रवारी (दि.२६) संध्याकाळी ७ वाजण्याच्या सुमारास पाण्याने भरलेला टँकर चालक मंगेश दत्तात्रेय करळकर हे आगरसुरे फाटा ते सातीर्जे या मार्गावरून घेऊन जात होते. त्यांचा वेगावरील ताबा सुटल्याने टँकर नदीवरील पुलाची लोखंडी रॅली तोडून पुलावरून खाली कोरड्या नदीपात्रात कोसळून अपघात झाला.

या अपघातात टँकर चालक मंगेश करळकर हे गंभीर जखमी होऊन मृत्युमुखी झाले. तर टँकरमध्ये सोबत असलेले टँकर मालक योगेंद्र गोविंद नार्वेकर हे



गंभीर जखमी झाले. गंभीर जखमी यांना बाहेर काढून पिंट्या गायकवाड यांच्या रुग्णवाहिकेतून अधिक उपचारासाठी अलिबाग येथील खासगी रुग्णालयात दाखल केले.

पान १ वरुन

## धैयशिल पाटलांची पुन्हा बोळवण?

तटकरे यांची उमेदवारी झाल्यानंतर त्यांच्या प्रचारासाठी म्हणावे तसे काम होत असल्याचे दिसत

नव्हते. पेण तालुक्यात सर्वाधिक मतदार असल्याने या ठिकाणी प्रचाराचे कामच झाले नाही, तर ते तटकरेंना परवडणारे नव्हते. त्यामुळे तटकरेंची धाकधुक चांगलीच वाढली होती.

शुक्रवारी महायुतीचे उमेदावाराचा प्रचारासाठी सभा घेऊन आम्ही कामाला लागलो आहोत असा संदेश देण्याचा प्रयत्न भाजपाने केला. तटकरेंच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना यासाठी पाचारण करण्यात आले होते. फडणवीस यांनी सुमारे २२ मिनीटे केलेल्या भाषणात फक्त मोदी यांनी कोणत्या योजना आणल्या त्याचा काय फायदा झाला आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), शिवसेना (ठाकरे गट) यांच्या जाहिरनाम्यावर टीका करण्यातच धन्यता मानली. स्थानिकांच्या प्रश्नावर ते फारसे काही बोलले नाहीत, अपवाद फक्त बाळगंगा धरणाचा होता.

फडणवीस यांना देखील धैर्यशिल पाटील यांची आणि त्यांच्या समर्थकांची नाराजी माहिती होती. त्यांनी भाषण संपताना शेवटच्या फक्त २२ सेकंदात धैर्यशिल पाटील आणि आमदार रविंद्र पाटील यांची वर्णी लावू असे मोगमपणे सांगितल्याचे दिसून आले. योग्य ठिकाणी वर्णी म्हणजे काय याबाबत धैर्यशिल यांच्या समर्थकांमध्ये अद्यापही संभ्रम असण्याची शक्यता नाकरता येणार नाही.

## आज ‘आघाडी’च्या सभांचा धडाका

दिवसेंदिवस वाढत आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे.

रायगड जिल्ह्यातील रोहा, श्रीवर्धन व पोलादपूर तालुक्यात रविवारी (दि.२८) इंडिया आघाडीच्या वतीने सभा आयोजित केली आहे. पोलादपूरमधील चोळई येथे सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास ही सभा होणार आहे. यावेळी शेकाप नेते आ.जयंत पाटील यांचे प्रमुख मार्गदर्शन असणार आहे. यावेळी शेकाप जिल्हा चिटणीस ॲड.आस्वाद पाटील, महाडच्या नगराध्यक्ष स्नेहल जगताप, शेकाप महाड विधानसभा चिटणीस एकनाथ गायकवाड, जगन्नाथ वाडकर, शेकाप पोलादपूर तालुका चिटणीस वैभव चांदे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. रोहा तालुक्यातील चणेरा येथे रविवारी (दि.२८) सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास सभा होणार आहे. तसेच श्रीवर्धन येथे रात्री आठ वाजण्याच्या सुमारास शेकाप नेते माजी आ. पंडित पाटील कार्यकर्त्यांसोबत संवाद साधणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

## महामार्गावर प्रवाशांची कोंडी

येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनांची संख्या वाढली आहे. परंतु, कोलाड, इंदापूर व माणगावमधील रस्त्याचे काम पंधरा वर्षांपासून अर्धवट स्थितीत असून, अद्यापही या कामात प्रगती नाही. या दोन्ही बाजारपेठेतील रस्ता अरुंद असल्यामुळे दररोज वाहतूक कोंडी निर्माण होत आहे.

किती ठेकेदार आले किती गेले? रस्त्याचे काम काय मार्गी लागत नाही. महामार्ग पूर्ण होण्यासाठी लोकनेत्यांकडून फक्त तारीख पे तारीख; परंतु, महामार्गाच्या कामात कोणतीही प्रगती नाही. यामध्ये ठेकेदारावर प्रशासनाचा नसलेला वचक यामुळे फक्त मनमानी सुरु आहे. रोज मरे त्याला कोण रडे! अशीच परिस्थिती असून, यामुळे नाहक बळी जात आहेत व अनेकांचे संसार उद्ध्वस्त होताना दिसत आहेत. याला जबाबदार कोण, असा प्रश्न प्रवासीवर्गातून केला जात आहे.

## बंद शाळा पुन्हा उघडणार

या शाळांपैकी दीडशे शाळा ७ मे रोजी मतदानाच्या दिवशी उघडणार आहेत. मात्र, मतदानाच्या दिवशी निवडणूक अधिकाऱ्यांसह मतदारांची गैरसोय होऊ नये याकरिता जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे.

रायगड लोकसभा मतदारसंघातील जिल्हा परिषदेच्या एक हजार ९८६ शाळा मतदान केंद्र म्हणून निवडल्या आहेत. या शाळांची पाहणी करण्यात आली. ज्या शाळांची दुरुस्ती, रंगरंगोटी करणे आवश्यक आहे, त्यांची रंगरंगोटी व दुरुस्तीचे काम जिल्ह्यात अनेक ठिकाणी सुरु आहे. त्यामध्ये बंद पडलेल्या शाळांपैकी दीडशे शाळांचीदेखील दुरुस्ती व रंगरंगोटी केली जात आहे.

बंद पडलेल्या शाळा गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्षित होत्या. शाळांच्या परिसरातदेखील कोणीच फिरकत नव्हते. मात्र, आता निवडणुकीच्या निमित्ताने या शाळांकडे प्रशासनाने लक्ष दिले आहे. मतदान करण्यासाठी येणाऱ्या मतदारांना जवळच मतदान केंद्र असावे, याकडे प्राधान्याने लक्ष देण्यात आले आहे. त्यानुसार गावातच बंद पडलेल्या शाळांची दुरुस्ती करण्याचे काम केले जात आहे. त्यामुळे बंद पडलेल्या शाळांना नवीन झळाळी येणार असून, एक दिवसासाठी तरी शाळा सकाळी साडेसात वाजल्यापासून सायंकाळी साडेपाच वाजेपर्यंत केंद्र अध्यक्षांपासून शिपाई, व मतदारांनी गजबजणार आहेत.

## अखेर कांद्यावरील निर्यातीबंदी उठवली

कांद्याची वाढलेली मागणी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला असून, कांदा निर्यात सुलभ होण्यासाठी नॅशनल को-ऑपरेटिव्ह एक्सपोर्ट्स लिमिटेड ही एजन्सी नियुक्त केल्याचे सरकारकडून सांगण्यात आले आहे. केंद्र सरकारने हा निर्णय घेतला असला तरी शेतकरी आणि व्यापाऱ्यांना मात्र सरसकट निर्यात बंदी मागे घेतील, अशी अपेक्षा होती. यासोबतच सरकारने कांद्याची खरेदी करताना एजन्सीमार्फत न करता थेट बाजारांमधून करावी, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

## अपघातात एकजण गंभीर

शनिवारी (दि.२७) पहाटेच्या सुमारास झाला. याबाबतीत उपलब्ध झालेल्या माहितीनुसार, मुंबई-गोवा महामार्गावर कोलाड बाजूकडून मुंबईकडे जाणारी कार क्र. एम.एच. ४३ बी.ई. १२३५ ही गोडसई गावाच्या हद्दीमध्ये आली असता नागोठणे बाजूकडून कोलाड बाजूकडे जाणारा कंटेनर क्र. एम.एच. ४६ ए.एफ. ७६८३ यांच्यात वाहनांवरील नियंत्रण सुटल्यामुळे समोरासमोर जोरदार धडक बसून भीषण अपघात घडला. या अपघातात कारमधील जगदीश पांडुरंग भुर्टे (६६) रा. परेल, कोळीवाडा-मुंबई हे गंभीररित्या जखमी झाले. त्यांना तातडीने एमजीएम रुग्णालय, कामोठे-पनवेल येथे पाठविण्यात आले.

दरम्यान, या अपघाताची माहिती मिळताच वाकण टॅबच्या कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन दोन्ही वाहने क्रेनच्या सहाय्याने रस्त्यावरुन बाजूला करुन वाहतूक सुरळीतरित्या सुरु करण्यात आली. दरम्यान, या अपघाताचा पुढील तपास नागोठणे पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक हरेष काळसेकर करीत आहेत.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी जमिन मालक कीथ लस्राडो शेनॉय यांच्याकडून खालीत वर्णनाच्या जमिन मिळकतीचे हक्क कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर जमिन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

जमिन मिळकतीचे वर्णन

| मौजे | तालुका | जिल्हा | गट क्रमांक | उपविभाग | क्षेत्र चौ.मी. हे.आर.पॉ. | पोट खराबा क्षेत्र | आकार | एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वारदोली | पनवेल | रायगड | ३२ | ३ | ०.३३.२० | ०.०४.७० | १.४४ | ०.३७.९० |
| वारदोली | पनवेल | रायगड | ३२ | २ | ०.०९.६० | ०.००.८० | ०.५६ | ०.१०.४० |
| वारदोली | पनेवल | रायगड | ३१ | १/ब/२ | ०.३५.२० | ०.०९.४० | ५.९१ | ०.४४.६० |

सदर वर नमूद जमिन मिळकतीचे हक्क हे आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर वर नमूद मिळकतीवर, वा मिळकतीबाबत मिळणाऱ्या भूखंडावर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण: पनवेल
दिनांक : २८/०४/२०२४

सही/-
पॉल लीगल असोसिएट
ऑफिस नंबर ३०१, तिसरा मजला,
ओम साई बिल्डिंग, प्लॉट नंबर १०१/३,
स्वामी नित्यानंद रोड, गार्डन हॉटेल जवळ,
पनवेल, रायगड, ४१०२०६
Email: info@paullegalassociates.com

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी जमिन मालक कीथ लस्राहो शेनॉय यांच्याकडून खालीत वर्णनाच्या जमिन मिळकतीचे हक्क कायमस्वरुपी विकत घेण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर जमिन मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

जमिन मिळकतीचे वर्णन.

| मौजे | तालुका | जिल्हा | गट क्रमांक | उपविभाग | क्षेत्र चौ.मी. हे.आर.पॉ. क्षेत्र | पोट खराबा | आकार | एकूण क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वारदोली | पनवेल | रायगड | ३१ | १/ब/२ | ०.३५.४० | ०.०९.३० | ५.९० | ०.४४.७० |
| वारदोली | पनवेल | रायगड | ३१ | १/अ | ०.२६.८० | ०.००.०० | ७.०० | ०.२६.८० |
| वारदोली | पनेवल | रायगड | ३० | २ | ०.२५.७० | ०.०३.०० | ३.८१ | ०.२८.७० |

सदर वर नमूद जमिन मिळकतीचे हक्क हे आमचे अशिलांनी खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तरी सदर वर नमूद मिळकतीवर, वा मिळकतीबाबत मिळणाऱ्या भूखंडावर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण: पनवेल
दिनांक : २८/०४/२०२४

सही/-
पॉल लीगल असोसिएट
ऑफिस नंबर ३०१, तिसरा मजला,
ओम साई बिल्डिंग, प्लॉट नंबर १०१/३,
स्वामी नित्यानंद रोड, गार्डन हॉटेल जवळ,
पनवेल, रायगड, ४१०२०६
Email: info@paullegalassociates.com

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)

# अनंत गीतेंना निवडून देण्याचा मुरूडकरांचा निर्धार

## चित्रलेखा पाटील यांची प्रमुख उपस्थिती

**। मुरूड । प्रतिनिधी ।**

आगामी रायगड लोकसभा मतदार संघातील इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांच्या प्रचाराकरिता मुरूड तालुक्यातील काशिद, भोईघर, मांडला, बोर्ली, कोर्लई, राजपुरी, आगरदंडा, एकदरा, आंबोली, सावली, शिघ्रे, विहुर येथे बैठका घेण्यात आल्या.

यावेळी शेकापकडून जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, शेकापचे ज्येष्ठ नेते तुकाराम पाटील, विजय गिदी, वामन चुनेकर, रमेश दिवेकर, किशोर धामणकर, रिझवान फहीम, राहिल कडू, चंद्रकांत कमाणे, विक्रांत वार्डे तर शिवसेना उद्धव ठाकरे गटाकडून प्रमोद भायदे, नौशाद दळवी, प्रशांत मिसाळ, आदेश दांडेकर, काँग्रेसकडून इस्माईल घोले, अस्लम हळदे, इस्माईल शेख, राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून हाफिझ कबले, नौशाद शाबान, मुझफ्फर सुर्वे आणि इतर प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते यांनी विविध ठिकाणी जाऊन गाठीभेटी घेतल्या.

इंडिया आघाडीचे उमेदवार अनंत गीते यांना मशालीसमोरचे एक नंबरचे बटन दाबून विजयी करण्याचा निर्धार केला. यावेळी बैठकांना कार्यकर्त्यांकडून उस्फूर्त प्रतिसाद मिळाला.






### दु:खद निधन



**श्री. दत्तात्रय शांताराम नाईक**
२६.५.१९३५-१७.४.२०२४
नाना

तुमची प्रेमळ,दयाळू स्मृती सदैव आमच्या हृदयात राहील.

**शोकाकुल**
नाईक,गोंधळी आणि म्हात्रे परिवार

सुंदर, निरोगी व प्रकाशमान डोळ्यांसाठी

K~Veda®
KHOJATI Over 175 Years SINCE 1847 TRADITION MOVING WITH TIME ORIGINAL

डोळयांना थंडावा देऊन दृष्टी स्वच्छ व निरोगी ठेवते.




३५ वर्षाच्या वयानंतर दररोज वापर करो | १२ वर्षाच्या वयानंतर दररोज वापर करो | डोळयांचा ताण जळजळणं कमी करून आराम | आयुर्वेदिक युनानी पद्धतीने गाईच्या शुद्ध तुपापासून बनवलेले अंजन | डोळयांना त्वरीत थंडावा देणारा | नाजूक व दमलेल्या डोळयांना त्वरीत थंडावा देणारा

मोतियाबिंद आणि चश्मयाचे वाढते नंबरसाठी आयुर्वेदिक-युनानी पुस्तकात त्रिफलाचे वापर करण्याची सल्ला दिली गेली आहे.
टि.व्ही.-कॉम्प्यूटर-मोबायलने होणारा डोळयांना त्रास व प्रदुषणाने होणारी डोळयांची जळजळ ह्या पासून डोळयांचे संरक्षण.

खोजाती आयुर्वेद फार्मा
प्रमुख मेडिकल आणि आयुर्वेदिक स्टोर्समध्ये उपलब्ध
KHOJATI SINCE 1847
022-23462600/01/02 | www.kveda.in @kvedabykhojati @kvedacare

## ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर नोटीस

दि.२७/०४/२०२४
जा.क्र.४०३/२०२४

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतराणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. नं. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ४ | १९८१/१ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम पहिला मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | प्रमोद रामचंद्र पाटील, निशा प्रमोद पाटील |
| २ | ४ | १९८१/२ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम पहिला मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | जागृती जयवंत शेळके |
| ३ | ४ | १९८१/३ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम पहिला मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | रिना केदारनाथ साखरकर, केदारनाथ नामदेव साखरकर |
| ४ | ४ | १९८१/४ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम पहिला मजला सदनिका ९३८ चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | माधुरी राजेश कटारिया, राजेश शंभुलाल कटारिया |
| ५ | ४ | १९८१.५ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम पहिला मजला सदनिका ९३८ चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | धनश्री मनोहर पोईलकर |
| ६ | ४ | १९८१/६ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम पहिला मजला सदनिका ९३८ चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | निलिमा सुरेश वाघमारे, सुरेश प्रल्हाद वाघमारे |
| ७ | ४ | १९८१/७ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | हर्षला परेश पाटील, परेश रामचंद्र पाटील |
| ८ | ४ | १९८१/८ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | अजिंक्य महादेव दांडेकर |
| ९ | ४ | १९८१/९ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | मेघा ज्ञानेश्वर लोटे, ज्ञानेश्वर महादू लोटे |
| १० | ४ | १९८१/१० | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ९९० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | सावित्री कांती गोरी, कांती वीरजी गोरी |
| ११ | ४ | १९८१/११ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ९९० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | प्रमोद कुमार, कविता |
| १२ | ४ | १९८१/१२ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ९४३ चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | अनिल तुकाराम पाटील, कविता अनिल पाटील |
| १३ | ४ | १९८१/१३ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | निकिता प्रशांत घरत |
| १४ | ४ | १९८१/१४ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | अजित विठ्ठल नार्वेकर प्रिया अजित नार्वेकर |
| १५ | ४ | १९८१/१५ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | तेजस अशोक घरत |
| १६ | ४ | १९८१/१६ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ९३८ चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | कल्पेश एकनाथ मढवी, तनुजा कल्पेश मढवी |
| १७ | ४ | १९८१/१७ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ९३८ चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | सुप्रिया चेतन गोठकर गजानन पांडुरंग गोठकर |
| १८ | ४ | १९८१/१८ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ९३८ चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | मयुरी निरव गडा, निरव खुशाल गडा |
| १९ | ४ | १९८१/१९ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | जानकी दर्शन वेद, दर्शन जितेंद्र वेद |
| २० | ४ | १९८१/२० | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | अविनाश शिवाजीराव वामन गौरव अनिल भांगे |
| २१ | ४ | १९८१/२१ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | जाई मंदार खाने, मंदार वसंत खाने |
| २२ | ४ | १९८१/२२ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ९९० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | अपर्णा महेश म्हात्रे |
| २३ | ४ | १९८१/२३ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका १०१४ चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | तेजश्री तुषार देसले, तुषार भास्कर देसले |
| २४ | ४ | १९८१/२४ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ९४३ चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | मोहन रतन फलटणकर, कल्पना मोहन फलटणकर |
| २५ | ४ | १९८२/१ | बालाजी पाल्म्स डि विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ला मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | दंडप्पा गुरूपडप्पा पाटील, जगदेवी भंडप्पा पाटील |
| २६ | ४ | १९८२/२ | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ला मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | दिप्ती सुनिल चव्हाण, सुनिल पांडुरंग चव्हाण |
| २७ | ४ | १९८२ /३ | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ला मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | प्राची कुलदिप भोसले |
| २८ | ४ | १९८२/४ | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ला मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | रश्मी राजेंद्र सुंकले, राजेंद्र मधुकर सुंकले |
| २९ | ४ | १९८२/५ | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ला मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | स्वागता तुषार घरत, तुषार रमेश घरत |
| ३० | ४ | १९८२/६ | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | समिक्षा सुशांत फळसणकर |
| ३१ | ४ | १९८२/७ | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | नम्रता भगवान कंखर, भगवान आनंदा कंखर |
| ३२ | ४ | १९८२/८ | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | प्रणिता जयेश वारगे, जयेश जगन्नाथ वारगे. |
| ३३ | ४ | १९८२/९ | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | मानसी महेश ठाकूर, महेश नारायण ठाकूर |
| ३४ | ४ | १९८२/१० | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | संजय सदानंद कवठेकर, शर्मिला सदानंद कवठेकर |
| ३५ | ४ | १९८२/११ | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | मयुर साहेबराव पवार, वैष्णवी मयुर पवार |
| ३६ | ४ | १९८२/१२ | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | सुरज राजेंद्र भडवलकर |
| ३७ | ४ | १९८२/१३ | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | मयुर तुषार कडू, तुषार गजानन कडू |
| ३८ | ४ | १९८२/१४ | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | दिपा अशिष केतकर, अशिष अरूण केतकर |
| ३९ | ४ | १९८२/१५ | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | नम्रता मनोज दिवेकर, मनोज कृष्णा दिवेकर |
| ४० | ४ | १९८२/१६ | बालाजी पाल्म्स ई विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | श्रेया योगेश म्हात्रे, योगेश अशोक म्हात्रे |
| ४१ | ४ | १९८३/१ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | शैलेश रामचंद्र कडवे |
| ४२ | ४ | १९८३/२ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | शैलेश कुमार जप्पा, कुमार अन्ना जप्पा |
| ४३ | ४ | १९८३/३ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | रोमीता राजेंद्र माने, धीरज राजन शिंदे |
| ४४ | ४ | १९८३/४ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला सदनिका ९३७ चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | निलम गोविंद बारमासे, गोविंद सखाराम बारमासे |
| ४५ | ४ | १९८३/५ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | प्रसाद वसंत काठे, प्रणोती प्रसाद काठे |
| ४६ | ४ | १९८३/६ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | प्रवीण पांडुरंग घरत |
| ४७ | ४ | १९८३/७ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | पंकज कुमार शर्मा, प्राची शर्मा |
| ४८ | ४ | १९८३/८ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | किरण जयंत शीर्धोरे |
| ४९ | ४ | १९८३/९ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | तेजस्वी चंदन पवार, चंदन प्रकाश पवार |
| ५० | ४ | १९८३/१० | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २रा मजला सदनिका ९६६ चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | प्रिती प्रशांत ठाकूर, प्रशांत जगजीवन ठाकूर |
| ५१ | ४ | १९८३/११ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | धनेश पदमाकर तांबडकर, अक्षता धनेश तांबडकर |
| ५२ | ४ | १९८३/१२ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | मनोज गोला |
| ५३ | ४ | १९८३/१३ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | रमेश नामदेव थळे, रसिका रमेश थळे |
| ५४ | ४ | १९८३/१४ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | कौशिक कांतीलाल पाठक, मेघना मेहुल पाठक, मेहुल कौशिक पाठक |
| ५५ | ४ | १९८३/१५ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | पल्लवी महेंद्र पाटील |
| ५६ | ४ | १९८३/१६ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | पंकज चंद्रकांत गडा, पंकती पंकज गडा |
| ५७ | ४ | १९८३/१७ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | संदेश शंकर चोरघे, कविता संदेश चोरघे |
| ५८ | ४ | १९८३/१८ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ३ रा मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | भारती हेरेश पाटील, हरेश गोपाळ पाटील |
| ५९ | ४ | १९८३/१९ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | निलेश सतिश रांजणे |
| ६० | ४ | १९८३/२० | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | प्रतिमा प्रदिप चव्हाण, पुजा प्रदिप चव्हाण |
| ६१ | ४ | १९८३/२१ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | सुभाष जगन्नाथ पाटील, स्नेहल सुभाष पाटील |
| ६२ | ४ | १९८३/२२ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ९६६ चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | प्रियांका दिनेश तावडे, दिनेश दामोदर तावडे |
| ६३ | ४ | १९८३/२३ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ६३० चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | रिकू वैभव कुंडळकर, वैभव दत्तात्रेय कुंडळकर |
| ६४ | ४ | १९८३/२४ | बालाजी पाल्म्स एफ विंग-गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ४ था मजला सदनिका ६३०चौ.फुट | बालाजी विश्वकर्मा असोसिएटस तर्फे पार्टनर गुल जयरामदास पंजवाणी | साहिल शंकर वर्तक |

सही/-
**श्री.निलेश लक्ष्मण गावंड**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**

सही/-
**सौ.स्वाती सतिश पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, तमनाथ ता. कर्जत जिल्हा रायगड येथिल खालील वर्णनाची जमिन मिळकत आमचे आशील श्रीरंग दिनकर सावंत हे अरूण बळीराम लाड या विदयमान मालकाकडुन खरेदी घेण्याचे ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र | आकार रू.पै |
|---|---|---|---|
| ३०/४ | ब | ०-५६-९० | ६-४२ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणाचाही विक्री, गहाण, भाडेपटटा, बक्षीसपत्र, वारस हक्क ,पोटगी, लीजचार्ज, ताबा, वहीवाट, अथवा कोणताही प्रकारे हक्क हितसंबंध असल्यास, सदर व्यवहारास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत नोंदवावी. सदर मुदतीत कोणतीही हरकत न आल्यास व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे आशिलावर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
२८/०४/२०२४
मो. नं ९२८४६७७५१६

आशीलातर्फे ॲडव्होकेट
**ॲड प्रफुल्ल विश्वनाथ देशमुख**
मु. पो कोंदीवडे ता कर्जत
जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटीसीने कळविणेत येते की, खाली नमुद केलेली शेतजमिन मिळकत ही या खाली दिलेल्या जमिन मालक यांचे नावावर ७/१२ उतारा सदरी महसुल दप्तरी नांवे असून त्या त्यांचे खुद्द ताबा कब्जा, मालकी वहिवाटीतील आहे त्या शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मौजे सुडकोली, ता. रोहा, जि. रायगड येथिल मिळकत.....**

| मालकाचं नांव | गट नं. | एकुण क्षेत्र हे आर | आकार रु. पै. | प्रकार |
|---|---|---|---|---|
| हाशम इस्माईल हळदे | १७/२ | जिरायत ०-२५-० | ६.१० | वर्ग १ |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमिन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे. यास्तव वरील मिळकतीवर अन्य कोणाचा गहाण, दान, लिज, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिन चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, ताबा, कब्जा, वहिवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, वाद, तंटा चालु असल्यास किंवा या व्यवहारास कोणाची काही हरकत असल्यास त्यांनी आपल्या हरकती लेखी कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन (८) आठ दिवसांत लेखी स्वरुपात दाखल करावी. अशा मुदतीमध्ये कोणतीही हरकत न आल्यास उपरोक्त मिळकत ही निर्वेध आहे असे समजुन आवश्यक कागदपत्रे सादर करुन खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करणेत येईल याची नोंद घ्यावी व त्यानंतर आलेली कोणतीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दि. २८/०४/२०२४

सही/-
**ॲड. पी.जी.दाभाडे**
रा. फ्लॅट नं. ४०२, बी. बींग, चौथा मजला,
साईनगरी सोसायटी, छत्रपती शिवाजी नगर,
डॉ.वागळे डॉस्पिटल जवळ, ता. रोहा, जि.
रायगड पिन नं.४०२१०९
मोबा नं. ९२७२७१३९५६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन त्यांनी सदरील मिळकतीवर सक्षम अधिकारी यांचेकडून मंजूर करून घेतलेल्या बांधकाम आराखडयासहीत विकसनाकरीता घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी परिशिष्ट मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी विकसन करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, करारनामा, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या विकसनाचे कराराचे व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला विकसन करार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**

**१) मौजे लाडिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेतीजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आर.पॉ से.मी. | रुपये | पैसे |
| चिंतन अरूण झवेरी | ६१ | ६१ | ०-०५-३५ | १० | ७० |
| | ४१ | २ | ५५-००-०० | ४ | ८४ |

सदरील मिळकतीवर मंजूर आराखडयामधिल टाइप ए (बिल्डींग नं १) व टाइप बी (बिल्डींग नं २) या इमारतींचा सुमारे २६५०.१६ चौ. मीटर व सक्षम अधिकारी यांचेकडून दुरूस्त परवानगीने मिळणाऱ्या एफ.एस.आय बाबत विकसन करार

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता:- फ्लॅट नं. ४, ए विंग, पहिला मजला,
गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१.

सही /-
**ॲड.जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- २८/०४/२०२४
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे दहिगांव व इंजिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतींचे मालक मनोहर अर्जुनराव साबणे यांचेकडून सदर मिळकती विकत घेणेचे ठरविले आहे.

| गांव | सर्व्हे क्रमांक | क्षेत्रफळ हे. आर. पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| दहिगांव | २५/३ | ०-११-०० | ०-०५ |
| | २५/४ | ०-१९-०० | ०-१० |
| | २६/१ | ०-०८-७० | ०-१० |
| | २६/२ | ०-१४-०० | ०-१० |
| इंजिवली | १८/३/ब | ०-०८-३० | ०-१० |
| | १८/७ | ०-१५-०० | ०-२० |
| | १८/८ | ०-०३-०० | ०-०५ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २८/०४/२०२४

**पत्ता**-गाळा नं.०९,कोर्ट व्हयू बिल्डींग,
तळ मजला,दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर,
कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

**ॲड.समीर आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
मो.नं. ९१५८३१३७३३

# संजोग वाघेरे यांना उरणमधून मताधिक्य देणार- जासई सरपंच संतोष घरत

**। उरण । वार्ताहर ।**

मावळ लोकसभा मतदारसंघातील इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग भिकू वाघेरे -पाटील यांना उरण तालुक्यातून भरघोस मताधिक्य मिळवून देण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाचे तालुका चिटणीस विकास नाईक यांनी आपल्या वरिष्ठ नेते मंडळींच्या मार्गदर्शनाखाली रणनीती आखण्यास सुरुवात केली आहे.त्यामुळे निश्चितच महायुतीच्या उमेदवारांना तालुक्यातून पराभवाची धूळ चारण्यात येईल असा विश्वास जासई ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष घरत यांनी व्यक्त केला आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २८ एप्रिल ते ०४ मे २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## सप्ताह उत्तम राहील

**मेष :** मेष राशीधारकांना आपले ग्रहमान पाहता या सप्ताहात सुरुवातीस आपल्यातील संवेदनशीलता वाढलेली असेल. कामाच्या भारामुळे मानसिक थकवा जाणवेल. नोकरी -व्यवसायाच्या ठिकाणी वरिष्ठांची व सहकाऱ्यांची मानसिकता सहकार्याची न राहिल्यामुळे आपणास नैराश्य येईल. वडिलांना त्रास होईल. आपल्या घरगुती संबंधात व कामात विचारपूर्वक वाटचाल करावी.जर शक्य असेल, तर कोणत्याही प्रकारचे वाद टाळावे. पैतृक संपत्ती किंवा वडिलांकडून होणाऱ्या प्राप्तीत कपात होऊ शकते. असे झाले तरी निराश होऊ नका. कठीण काळानंतर चांगल्या परिस्थितीचा अनुभव घेता येईल. उत्तरार्धात शारीरिक व मानसिक तजेला व स्फूर्ती जाणवेल. नवीन कार्याच्या शुभारंभासाठी हा सप्ताह अनुकूल आहे. व्यापारात विस्ताराचा किंवा चांगल्या पगाराच्या नोकरीचा गंभीरतेने विचार करू शकाल. **महिलांना :** दुसऱ्यांवर अवलंबून न राहता आपल्या आत्मविश्वासाने स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न केल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करू शकाल. आप्तेष्टांच्या संपर्कात राहता येईल व त्यांची ख्याली-खुशाली घेता येईल. **शुभदिनांक :** २८,२९

## कलागुणांना वाव मिळेल

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहातील ग्रहमान पाहता कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. नको त्या जबाबदाऱ्या स्वीकारू नका. मित्रांकडून लाभ होईल, तसेच त्यांच्यासाठी खर्चसुद्धा करावा लागेल. विवाहेच्छुकांना योग्य जोडीदार मिळण्याची शक्यता आहे. विदेशाशी व्यापार करणाऱ्यांना किंवा विदेशी संस्थेत काम करणाऱ्यांना अतिरिक्त प्राप्ती होईल. या महिन्यात शारीरिक व मानसिकदृष्ट्या आपण ताजेपणा व प्रसन्नतेचा अनुभव घ्याल. कुटुंबीय व मित्रांच्या सहवासात स्वादिष्ट भोजनाचा आस्वाद घेण्याचा आनंद उपभोगू शकाल. मनातून नकारात्मक विचार काढून टाकल्यास आपला आनंद द्विगुणित होऊ शकेल. विद्यार्थ्यांनी मित्रांबरोबर फिरणे कमी करून अभ्यासाकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. यापूर्वी मित्रांशी, मैत्रिणीसोबत जर काही कारणांनी तणाव निर्माण झाला असेल, तर तो या साप्ताहात निवळेल. **महिलांना :** आपण प्रत्येक बाबतीत नम्रतेचे धोरण स्वीकारल्यास हाती घेतलेल्या कार्यात यश मिळू शकेल. आपल्या आवडीच्या गोष्टी करण्यात आनंद घेता येईल. दूरच्या आप्तेष्टांशी वार्तालाप होण्याची शक्यता आहे. **शुभदिनांक :** ३०,१.

## नोकरीत वरिष्ठांचे सहकार्य मिळेल

**मिथुन :** राशीसाठी आपले ग्रहमान पाहता विवाहेच्छुकांना जोडीदाराची निवड करताना काळजी घेण्याचा सल्ला देण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना सध्या अतिरिक्त कष्ट करण्याची तयारी ठेवावी लागेल, तसेच अधूनमधून इतरांकडून मार्गदर्शन घेण्याचीसुद्धा त्यांना गरज भासेल. या कालावधीत आपण जर आहारातील अतिशयोक्ती टाळलीत, तरच आरोग्य चांगले राहू शकेल. उत्तरार्धात कफ विकार होण्याच्या शक्यतेमुळे बदलत्या ऋतूत आपणास काळजी घ्यावी लागेल. आपली माहेरची माणसे घरी येतील, त्यांची ऊठबस करावी लागेल. कामात असताना तब्येतीकडे दुर्लक्ष करू नका, आपण नोकरीत सहकाऱ्यांचे सहकार्य मिळू शकेल. व्यापार-व्यवसायाचा विस्तार करण्याच्या बाबतीत अधिक विचार करत बसल्यास हाती आलेली संधी गमावून बसाल. उत्तरार्धात काहीतरी नवीन करण्याचे धाडस वाढू शकते. आहाराकडे दुर्लक्ष केल्यास प्रकृतीस त्रास होऊ शकतो. घरातील अनावश्यक खर्चाला आळा घाला, त्यामुळे मनावर ताण येणार नाही **महिलांना :** घरातील वातावरण आनंदी राहील, प्रवासात काळजी घ्या, वैवाहिक जोडीदाराशी जुळवून घ्या. आपल्या ध्येयासाठी प्रयत्नशील राहा. **शुभदिनांक-** २,३

## वादविवादाचे प्रसंग टाळा

**कर्क :** राशीधारकास या सप्ताहात आपण थोडे अस्वस्थ राहाल, याव्यतिरिक्त उत्तरार्धात उष्णतेचे विकार, बद्धकोष्ठ इत्यादींचा त्रास होऊ शकतो. मोठ्या व्यक्तींचे रागाचे बोलणे मनावर घेऊ नका. घरात एखादी किमती वस्तूची खरेदी होणार आहे. ज्यांची अभ्यासात लक्ष लागत नसल्याची तक्रार असेल, त्यांना ह्या सप्ताहात दिलासा मिळेल. प्रणयी जीवनातसुद्धा काही समस्या निर्माण झाल्या असल्या तर शांतपणे चर्चा करून त्यांचे निराकरण करू शकाल. आपल्या मित्र परिवारात भिन्नलिंगी व्यक्तींची वाढ होण्याची शक्यता आहे. विवाहितांच्या जीवनात दीर्घकाळापासून काही तणाव असल्यास त्याचेसुद्धा निराकरण होईल. आरोग्याच्या बाबतीत आपणास काळजी घ्यावी लागेल. भविष्यात मोठे आजारपण येऊ नये म्हणून सामान्य आजाराकडे दुर्लक्ष करू नये. योग्य प्रमाणात झोप घेऊन तसेच योगासन, ध्यान-धारणा इत्यादी प्रवृत्तीत मन रमवून आपण तणावमुक्त होऊ शकाल. **महिलांना :** वादाचे प्रसंग टाळावेत. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभदिनांक :** २८,२९

## व्यवसायात यश प्राप्त होईल

**धनु :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण ह्या सप्ताहात सुरुवातीपासूनच आपण व्यावसायिक आघाडीवर अधिक सक्रिय व्हाल; परंतु कोणताही निर्णय घेताना किंवा जेथे इतरांसह काम करावयाचे असेल तेथे विचारपूर्वक वाटचाल करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. एखादा करार करावयाचा असल्यास विलंब किंवा अडथळे येण्याची शक्यतासुद्धा नाकारता येत नाही. व्यवसायात आपण नवीन विचारसरणीची अंमलबजावणी कराल. कर्मचाऱ्यांशी आपले संबंध सामान्यच राहतील. ह्या सप्ताहाच्या पूर्वार्धात आपण कुटुंबियांसह एखाद्या प्रवासास किंवा सामाजिक संमेलनास जाण्याची शक्यता आहे. दीर्घ कालावधीनंतर जुन्या मित्रांची भेट होईल. विदेशात राहणाऱ्या नातेवाईकांकडून चांगली बातमी मिळेल. वडीलधाऱ्या व्यक्ती तसेच मित्रांपासून काही लाभ होईल, तसेच सुखद क्षणांचा अनुभव घेता येईल. **महिलांना :** वैवाहिक जीवनातील संबंधात स्थैर्य जाणवेल. कदाचित संबंधात उत्साह वाढविण्यासाठी आपणास प्रयत्न करावे लागतील. आपली अस्मिता क्षुल्लक कारणाने दुखावली जाणार नाही याची दक्षता घेतल्यास आपल्या मनाप्रमाणे पुष्कळशा गोष्टी साध्य होणे शक्य आहे. **शुभदिनांक-** ०२, ०४.

## कार्यक्षमतेत वाढ होईल

**मकर :** हा साप्ताह मकर राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता मागील काही दिवसांपासून आपण स्वतःच्या व्यक्तिगत समस्या, आरोग्य किंवा आत्मविश्वासाच्या अभावाने त्रस्त होता, त्या ह्या आठवड्यात संपुष्टात येतील. आता आपण नवीन उर्जे सह नव्याने सुरवात करण्यास उत्साहित व्हाल. आता कामाकडे अधिक लक्ष देऊ शकाल. अंगावर पडलेली कामे आपण पटापट पूर्ण केल्याने आपल्या कार्यक्षमतेतसुद्धा वाढ होईल. ज्यांचा दीर्घकालीन लाभ होऊ शकेल अशा नवीन लोकांच्या संपर्कात आपण याल. काही ग्रहांचे भ्रमण आपणास काहीसे अनुकूल होईल. आपणास गुंतवणूक करण्याची इच्छा होईल. कदाचित आपण शेअर्स, सट्टा किंवा लॉटरीत आपले नशीब अजमावून बघाल. गुंतवणूक करताना नेहमी दीर्घकालीन कालावधीसाठी गुतवणूक करावी. शासनाशी संबंधित एखादा प्रकल्प करण्याची इच्छा होईल. कठोर परिश्रमास काहीही पर्याय नाही हे लक्षात ठेवावे. हा कालावधी विद्यार्थ्यांसाठी उत्तम आहे. **महिलांना :** वादाचे प्रसंग टाळावेत. आपल्या रागावर नियंत्रण ठेवून शांतता बाळगल्यास आपण सर्व बाबतीत अग्रेसर राहू शकाल. **शुभदिनांक -** २८,३.

## वैवाहिक जीवनात समाधान मिळेल

**सिंह :** राशीसाठी या सप्ताहात आपण एखाद्या व्यक्तीच्या प्रेमात पडण्याची किंवा प्रिय व्यक्तीसमक्ष आपल्या प्रेमाचा प्रस्ताव मांडण्याची दाट शक्यता आहे. वैवाहिक जीवनात सुख समाधान प्राप्ती होऊ शकेल. पूर्वार्धात प्रणयी जीवनात अधिकार गाजवण्याची भावना सुद्धा वृद्धिंगत होईल. संसार सांभाळून आध्यात्मिक बाबींकडेसुद्धा आपला कल होईल. नोकरदारांनी वरिष्ठांशी जुळवून घेण्याचा प्रयत्न करावा, गूढ व रहस्यमय विद्येकडे आकर्षित व्हाल. मनन-चिंतन करून आपणास अद्भुत अनुभूती होऊ शकेल. आपणास आरोग्याची विशेष काळजी घ्यावी लागेल. एखादा अपघात संभवतो. या महिन्यात आपणास जिभेचे चोचले पुरविण्याची प्रबळ इच्छा होऊन भोजनाच्या अतिशयोक्तीमुळे काही विकार होण्याची शक्यता आहे. कॉलेजमध्ये असलेल्यांचे प्रणयी संबंध खुलून येतील. त्यासाठी विशेषतः अखेरचा कालावधी अधिक अनुकूल आहे. **महिलांना :** प्रकृतीस्वास्थ्य जपा. विरोधकांच्या कारवायांवर नजर ठेवा. आपण एखादा दागिना कराल, लग्न समारंभात धावपळ होईल. दुसऱ्यांवर अवलंबून न राहता स्वयंसिद्ध होण्याचा प्रयत्न करा. **शुभदिनांक :** ०१,०४

## विवाहेच्छुकांना जोडीदार मिळेल

**कन्या :** राशीसाठी या सप्ताहात सुरवातीला विवाहेच्छुकांना योग्य जोडीदार मिळण्याची शक्यता आहे. जोडीदाराची निवड करताना बाह्यरूपाऐवजी गुणांना प्राधान्य द्यावे. आपले मन रोमँटिक विचारात गढून गेलेले असेल. आपणास समाजात यश -कीर्ती याचा लाभ होईल. आरोग्याच्या बाबतीत शारीरिक व मानसिक बेचैनी सतावेल. संततीच्या आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. शारीरिक व मानसिक स्वास्थ्याची जपणूक करून आपण सर्व कामे करू शकाल. परिणामतः कामेसुद्धा उत्तम प्रकारे करू शकाल. शरीरास उष्णतेचे विकार किंवा त्वचा विकार होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांची अभ्यासाशी संबंधित काळजीत वाढ होईल. त्यांना अधिक कष्ट करावे लागतील. उच्च शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांना जागरणेसुद्धा करावी लागतील. डोळ्यांची काळजी घ्यावी लागेल. **महिलांना :** मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. तरीही ग्रहमान पाहता आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. संसर्गजन्य आजारापासून तब्बेत सांभाळा. आरोग्याची काळजी घ्यावी. **शुभ दिनांक-** २९,२

## प्रगतीची शिखरे सर कराल

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी वरिष्ठ व सहकाऱ्यांच्या मदतीने लहान-मोठी प्रगतीची शिखरे सहज सर करू शकाल. हा कालावधी व्यापाऱ्यांसाठी उत्तम आहे. या दिवसांत नवीन लोकांशी भागीदारी व्यवसाय सुरु करण्याची किंवा त्यांच्या मार्गदर्शनाखाली किंवा अन्य प्रकारे सहकार्य करून प्राप्तीत वाढ होऊ शकेल अशा एखाद्या प्रवृत्तीत आपण सहभागी होऊ शकाल. व्यापाऱ्यांना प्राप्तीत वाढ होण्याची, सध्याच्या व्यवसायाचा विस्तार होण्याची किंवा वसुली होण्याची दाट शक्यता आहे. आपले वडिलांशी संबंध सुधारतील. संततीच्या सहवासात वेळ घालवू शकाल. मात्र, त्यांच्याशी संबंधित प्रवृत्तीत किंवा कार्यात थोडा विलंब होण्याच्या शक्यतेस नाकारू शकत नाही. सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक आघाडीवर लाभ होण्याचे संकेत आहेत. **महिलांना :** आपले मन स्थिर ठेवा, वाहात जाऊ नका, विचारांपासून लांब राहा, नको त्या विचारात अडकू नका. तब्बेत ठीक वाटत नसेल तर प्रवास टाळा, मित्र-मैत्रिणी खुशखबर देतील. सप्ताहाच्या मध्यावर धनलाभ संभवतो. **शुभदिनांक-** ३०,३.

## आर्थिक व्यवहार फायदेशीर ठरतील

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता ह्या कालावधीत आपण भिन्नलिंगी संबंध, वैवाहिक जीवन, कौटुंबिक व आर्थिक बाबींकडे अधिक लक्ष द्याल. वैवाहिक जोडीदार आपल्यावर प्रेमाचा वर्षाव करेल. आपण प्रत्येक कार्य दृढ आत्मविश्वास व मनोबलाच्या जोरावर यशस्वीपणे पूर्ण कराल. पिता किंवा पैतृक संपत्तीपासून लाभ होईल. शासनाकडून किंवा त्यांच्याशी केलेल्या आर्थिक व्यवहारामुळे फायदा होईल. कामात स्पर्धेस सामोरे जावे लागले तरी आपल्या कर्तव्यनिष्ठेमुळे आपण त्यात यशस्वी व्हाल. विद्यार्थ्यांना अभ्यासात चांगली कामगिरी होण्यासाठी नियोजनपूर्वक अभ्यास करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. अडगळीच्या वस्तूंमुळे नकारात्मक ऊर्जा तयार होत असल्याने अभ्यासाच्या खोलीत कोणतीही अडगळ ठेवू नये. घरात सुख-शांती नांदावी म्हणून कोणतेही कार्य किंवा चर्चा करताना कोणाचा गैरसमज होणार नाही याची काळजी घ्यावी. महिलांना : आपण बोलण्यावर नियंत्रण ठेवून कृतीवर भर दिल्यास पुष्कळशा गोष्टी साध्य करता येतील. नोकरदारांना दिलासा मिळेल. कलाक्षेत्राला चांगले प्रोत्साहन मिळेल, शुभदिनांक : १,३.

## कुटुंबियांचा सहवास लाभेल

**कुंभ :** राशी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता मित्र व कुटुंबियांच्या सहवासात अत्यंत आनंदात वेळ घालवू शकाल. आपल्या प्रतिष्ठेत, लोकप्रियतेत व समृद्धीत वृद्धी होईल. आपल्या बुद्धिचातुर्याने नोकरीत लाभ होण्याची शक्यता आहे. व्यावसायिक आघाडीवर आपली स्थिती, पद व प्रतिष्ठा प्रबळ करण्यावर आपण लक्ष केंद्रित कराल. आपणास रागावर नियंत्रण ठेवण्याचा विशेष सल्ला देण्यात येत आहे. कोणतेही कार्य किंवा संबंध बिघडण्यास हा राग कारणीभूत होऊ शकेल. भागीदारी कार्यात भागीदाराकडून दगा-फटका होणार नाही ह्याची काळजी घ्यावी. भागीदारीत नवीन कार्याचा प्रारंभ करू नका. नवीन करार करण्यातसुद्धा काळजी घ्यावी. वाहनसौख्य मिळू शकेल. पूर्वार्धात विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढू शकेल. हा आठवडा स्पर्धात्मक परीक्षेची किंवा व्यावसायिक अभ्यासाशी संबंधित प्रवेश परीक्षेची पूर्वतयारी करण्यास अनुकूल आहे. **महिलांना :** महिलांना धनलाभासाठी हा काळ उत्तम असून, त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल. नवीन ओळख फायदा देणारी ठरणार आहे, विशेषतः मोसमी आजारांपासून सावध राहा. **शुभदिनांक-** २९, ०४.

## घरात नवीन वस्तू खरेदीचे योग

**मीन :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता ह्या साप्ताहात बहुतांशी आपली वृत्ती न्यायाने युक्त असेल. कुटुंबियांशी आनंदात वेळ घालवू शकाल. आपण कौटुंबिक बाबींकडे विशेष लक्ष द्याल. कुटुंबियांशी महत्वाची चर्चा करू शकाल. घरसजावटीसाठी नवीन वस्तूंची खरेदीसुद्धा कराल. आपण जे काही कार्य कराल त्यात यशस्वी झालात तरीसुद्धा आपला उत्साह मंदावणार नाही ह्याची काळजी घ्यावी. स्त्रियांकडून लाभ होण्याची शक्यता आहे. धार्मिक प्रवासाचे आयोजन करू शकाल. व्यापार-व्यवसायात अपेक्षित यश मिळू शकेल. प्राप्तीत वाढ होईल. कामाचा ढीग बघून न घाबरता नियोजनपूर्वक मार्गक्रमण करून निर्धारित वेळेत कामे पूर्ण करण्यासाठी आपण प्रेरित व्हाल. हौसमौज, मनोरंजन प्रवृत्ती ह्यात वेळ घालवू शकाल. वाहनसौख्य उत्तम मिळेल. सामाजिक कार्यानिमित्त बाहेरगावी जावे लागण्याची शक्यता आहे. **महिलांना :** थोड्या फार समस्या आल्या तरी विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. संसर्गजन्य आजारापासून तब्बेत सांभाळा. **शुभदिनांक-** ३०,०२.


## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक


## जाहीर नोटीस

आमचे अशिल श्री. राजाराम नारायण पडवळ यांच्यातर्फे तमाम जनतेस याद्वारे असे सुचित करण्यात येते की,

मौजे म्हात्रोळी, ता. अलिबाग येथील खालील वर्णनाच्या मिळकती या जाहीर नोटीसीचा विषय आहेत

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. /हि. नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|
| १) म्हात्रोळी | २२६/१/२ | २-१४-४० | १६-४३ |
| | | पो. ख.०-१७-५० | |
| | | २-३१-५० | |
| २) म्हात्रोळी | २२६/अ/१/१ | ०-४३-०० | ४३०.०० |
| ३) म्हात्रोळी | २२६/अ/१ | ०-२५-४० | ४-२९ |
| | | पो. ख. ०-०५-६० | |
| | | ०-३१-०० | |

सदरच्या सर्व मिळकतींचा मुळ गट नं. २२६/१ असा होता. गट नं. २२६/१ ही मिळकत पुर्वी सारळ या महसुली गावात समाविष्ट होती व कै. काशिनाथ नथु नाईक हे सदर मिळकतीचे कुळ होते. ते ता. ०९/०२/१९६९ रोजी मयत झाल्यानंतर मौजे सारळ फेरफार नोंद नं. १८६८ ने श्री. मारेश्वर काशिनाथ नाईक व आमच्या अशिलांनी आई, सौ. वत्सला नारायण पडवळ यांच्या नावांची नोंद महसुल दफ्तरी करण्यात आली. परंतु मारेश्वर काशिनाथ नाईक यांचे नाव एकत्र कुटुंब पुढारी म्हणून सदर मिळकतींचे ७/१२ सदरी दाखल करण्यात आली.

मोरेश्वर काशिनाथ नाईक हे मयत झाल्यानंतर फेरफार नोंद नं. ९२ नं केवळ मोरेश्वर काशिनाथ नाईक यांच्या वारसांची नावे ७/१२ नमुद करण्यात आले व आमचे अशिल श्री. राजाराम नारायण पडवळ यांची आई, वत्सला नारायण पडवळ यांचे नाव नमुद करण्यात आले नाही. असे असले तरी देखील गट नं. २२६/१ या मिळकतीमध्ये वत्सला नारायण पडवळ यांचा १/२ (निम्मा) अविभक्त हिस्सा होता व आहे व तिच्या पश्चात आमचे अशिल व इतर भावंडांचा १/२ अविभक्त हिस्सा आहे.

अशी वस्तुस्थिती असताना श्री. सुधाकर मारेशवर नाईक, वगैरे यांनी आमचे अशिलांची आई, वत्सला नारायण पडवळ हिचे नाव ७/१२ सदरी दाखल नसल्याचा गैरफायदा घेवून गट नं. २२६/१ या मिळकतीपैकी ७४ आर एवढा भाग श्री. निरज माहन पटेल यांना विकल्याचे व गट नं. २२६/१/२ पैकी ० हेक्टर २४.३० आर एवढे क्षेत्र श्री.आशिष गीरधारीलाल वैद यांना विकल्याचे आमच्या अशिलांना अलिकडेच समजले आहे. तसेच गट नं. २२६/१ या मिळकतीमधून गट नं. २३१/१ व २३१/२ या मिळकतींच्या मालकांना ६०० चौ. मिटर वहीवाटीचा रस्ता दिला आहे. सदरचे व्यवहार झाल्यानंतर गट नं. २२६/१ या मिळकतीचे वर नमुद केल्याप्रमाणे गट नं. २२६/१/२, गट नं. २२६/अ/१/१ व गट नं. २२६/अ/१ असे तिन स्वतंत्र भाग पडले आहेत. सदरचे सर्व व्यवहार आमच्या अशिलांच्या संमतीशिवाय झाले असल्यामुळे ते आमच्या अशिलांवर वर बंधनकारक नाहीत. तसेच, श्री. सुधाकर मारेश्वर नाईक, वगैर यांनी गट नं. २२६/१/२ या मिळकतीचा भाग विक्रीस काढल्याचे आमचे अशिलांना खात्रीशीर समजले आहे.

कै. वत्सला नारायण पडवळ यांचे वारस म्हणून आमचे अशिल व त्यांच्या भावंडांचा वर नमुद सर्व मिळकतीमध्ये १/२ (निम्मा) अविभक्त हिस्सा आहे. आमचे अशिल हे लवकरच वर नमुद सर्व मिळकतींचे झालेले व्यवहार त्यांच्या हिश्यावर बंधनकारक नाहीत, असे ठरवून मिळणेकरीता व मिळकतींच्या वाटपाकरीता योग्य तो दावा मे. दिवाणी कोर्टात दाखल करणार आहेत.

तरी, वर नमुद मौजे म्हात्रोळी गट नं. २२६/१/२, गट नं. २२६/अ/१/१ व गट नं. २२६/अ/१ या मिळकतीसंदर्भात कुणीही श्री. सुधाकर मारेशवर नाईक, वगैरे, श्री. निरज माहन पटेल व श्री. आशिष गीरधारीलाल वैद यांच्याबरोबर कोणत्याही प्रकारचा व्यवहार करू नये. तसा व्यवहार कुणीही केल्यास तो आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाही, हे सर्वांना कळावे.

अलिबाग
ता. २८/०४/२०२४

**ॲड. विधान अरविंद पाटील.**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९४२२३७५११५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. रोहन निरंजन ठाकर, रा.शांती निवास, जे.एम.ठक्कर रोड, जैन मंदीर शेजारी, इतवरी, नागपूर, महाराष्ट्र यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या सदनिका मिळकती मे. आशना कन्स्ट्रक्शन तर्फे चिंतन अरुण झवेरी यांचेकडून दिनांक २२ ऑगस्ट २०१९ रोजीचे करारनाम्याने खरेदी केलेल्या आहेत सदरील करारनामा मा. दुय्यम निबंधक कर्जत यांचेकडे नोंदणी अनुक्रमांक २८१०/२०१९ अन्वये नोंदणी केलेला होता. सदरील करारनामा माझे अशिल यांचेकडून गहाळ/हरवलेला असून त्याप्रमाणे माझे अशिल यांनी त्याबाबत डि. एन. नगर पोलिस स्टेशन, अंधेरी, मुंबई यांचेकडे तक्रार क्र. ३३६६७/२०२४ अन्वये दिनांक २४ एप्रिल २०२४ रोजी तक्रार नोंदविलेली आहे. सदरील करारनामा कोणासही सापडल्यास अथवा सदरील कराराचे अनुशंगाने कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा विक्री, गहान, करारनामा, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात कळवावे अथवा सदरील करार मुळ प्रत कोणासही सापडल्यास खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत सदरील कराराने असलेले सर्व हक्क संबंधित व्यक्तीने सोडून दिले आहेत असे समजण्यात येईल. तसेच मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :-**
**परिशिष्ट**

१) मौजे - लाडिवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत यावर ग्रिन वुडस या निवासी प्रकल्पातील सदनिका मिळकत

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | आर.-पॉ-से.मी | रुपये | पैसे |
| चिंतन अरूण झवेरी | ६१ | ६१ | ०-०५-३५ | १० | ७० |
| | ४१ | २ | ५५-००-०० | ४ | ८४ |

सदरील मिळकतीवर मंजूर आराखडयामधिल **टाइप ए (बिल्डींग नं १)** मधिल
ए विंग मधिल फ्लॅट नं १०१, १०२, १०३, १०४
बि विंग मधिल फ्लॅट नं ४०१
सि विंग मधिल फ्लॅट नं ४०२
सदरील मिळकतीवर मंजूर आराखडयामधिल **टाइप बी (बिल्डींग नं २)** मधिल
ए विंग मधिल फ्लॅट नं १०२, १०३, ३०२, ३०३, ४०३, ४०४
बि विंग मधिल फ्लॅट नं २०१, २०२, २०३, ४०३, ४०४
सि विंग मधिल फ्लॅट नं ४०२

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही / -
कार्यालयीन पत्ता:फ्लॅट नं.४, ए विंग, पहिला मजला, **ॲड.जयेश संभाजी म्हसे**
गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी, दिनांक : २८/०४/२०२४
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१. मो. नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## ग्रामपंचायत चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड
## जाहीर नोटीस

दि.२७/०४/२०२४
जा.क्र.४०४/२०२४

महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम १९६० नुसार १६ अ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतराणासंबंधाने ग्रामपंचायत चेंढरेस प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटिसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणाच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रामपंचायत चेंढरे कडे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसूलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करून ग्रामपंचायत दप्तरी याची नोंद घेतली जाईल.

| अ. नं. | प्रभाग क्रमांक | मालमत्ता क्रमांक | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे वर्णन | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | २ | १४४०/६ | कमलकुंज को.ऑप.हौ.सोसा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम ८८० चौ.फूट | कै.उमेश हरिश्चंद्र धागावकर, | श्रीम.मनिषा उमेश धागावकर कु.तन्मय उमेश धागावकर, कु. उमेश धागावकर |
| २ | ५ | ५४८/१,२ | पिंपळभाट | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला ७९२ चौ.फुट, १ मजला ७५० चौ.फुट | योगेश खंडेराव घोरपडे | श्रीम.अंजली योगेश घोरपडे, कु.सौरभ योगेश घोरपडे, कु.श्रुती योगेश घोरपडे. |
| ३ | २ | १९३४/७ | सोनिराय रेसिडेन्सी शिवाजीनगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ६४८ चौ.फुट | क्रिश कंस्ट्रक्शन तर्फे प्रोप्रायटर सविता घनश्याम पुरस्वानी | उत्तम चंद्रकांत रसाळ, स्वाती उत्तम रसाळ |
| ४ | २ | १५४५/२० | एकलव्य सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २मजला ८७५ चौ.फुट | सुबोध रामनाथ चिपळुणकर योगिता सुबोध चिपळुणकर | रोहन सुरेंद्र वडे, रिद्धी रोहन वडे |
| ५ | २ | १७७४.११ | रिया रिचा कॉम्पलेक्स | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ८२५ चौ.फुट, ७०० चौ.फुट | ओमकार रेसिडेन्सी तर्फे प्रोप्रा. श्री.सुजित शांताराम घरत | विक्रांत विजय वार्डे |
| ६ | ४ | १७२५/१ | सिगल रेसिडेन्सी बिल्डींग क्र.४ | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ६४७.१३ चौ.फुट | श्री.पंकज एकनाथ ठाकूर सौ.पुर्वा पंकज ठाकूर | आकाश गोपाळ जाखेरे, प्राजक्ता सिताराम खाडे |
| ७ | ४ | १६८२/२६ | सिगल रेसिडेन्सी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चौ.फुट | श्री.विनयकुमार एकनाथ चौधरी, सौ.हेमलता विनयकुमार चौधरी | श्रीमती.हेमलता विनयकुमार चौधरी, कुमार, अमेय विनयकुमार चौधरी |
| ८ | १ | ११२३/५ | भास्कर रेसिडेन्सी बी विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ८४० चौ.फुट | सुनिल शरद इनामदार | नेत्रा रामचंद्र म्हात्रे, रामचंद्र जाखा म्हात्रे |
| ९ | ५ | ७०७/३ | विष्णू लक्ष्मी विहार अपार्टमेंट | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम दुकानगाळा ४७५ चौ.फुट | किती केसरीनाथ पाटील | रितेश केसरीनाथ पाटील |
| १० | ३ | १६९५/१० | साई रेसिडेन्सी | आर.सी.सी पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ७६० चौ.फुट | मे.जेट इन्फ्राव्हेंचर लि. डायरेक्टर श्री.राजुल रमेशचंद्र शाह तर्फे अखत्यारी श्री. शिवप्रसाद विलास केरकर | सौ.माधुरी हेसराज पाटील, श्री.हेसराज दाजी पाटील, श्री.प्रसन्ना हेसराज पाटील |
| ११ | २ | १६८४/५ | पटीवाला हाऊस सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ६०० चौ.फुट | श्री.संजय धाऊ म्हात्रे सौ.लिनता संजय म्हात्रे | तृप्ती संजय म्हात्रे, संजय संजय अनंत म्हात्रे |
| १२ | ४ | १७३०.३ | गोल्ड कॉस्ट सोसायटी बी विंग | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ४५० चौ.फुट | ए स्केअर कंस्ट्रक्शन तर्फे पार्टनर नरेन प्रेमचंद्र नागडा | राजकिशोर नरहरी मल्लीक |
| १३ | ६ | ७०७/११ | विष्णू लक्ष्मी विहार अपार्टमेंट | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम २ मजला ५८० चौ.फूट | प्रथमेश चंद्रकांत वर्तक | रामदास हरियचंद्र थळे |
| १४ | ६ | ७२२/२/१, ७२२/२/२ | पंचरत्न सोसायटी, चेंढरे | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ८०५ चौ.फूट, ओपन टेरेस ८०५ चौ.फुट | सुहास दिगंबर आठल्ये | शंकर दिगंबर आठल्ये, राहुल शंकर आठल्ये |
| १५ | २ | ८२६ | न्यु महाराष्ट्र बेकरी, मुकबधीर शाळेजवळ | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चौ.फूट | श्री.सुग्रीव परशुराम यादव | इनामउल्ली सफी महंमद चौधरी फब्रुददीन महंमद नईन चौधरी, जलालुददीन कोदन चौधरी, राम लखन यादव |
| १६ | ३ | ८६१/५ | वेदांत सोसा.पंतनगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम १ मजला ३२५ चौ.फुट | दयानंद गजानन देसाई | सचिंद्र वसंत आंगणे |
| १७ | ३ | ३०८/१ | पंतनगर | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चौ.फूट | श्री.सुभाष बाळकृष्ण कुलकर्णी | संध्या सुभाष कुलकर्णी |
| १८ | १ | ७१/२ | कावेरी सोसा. | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चौ.फुट | कुंदन जाया कोळी लग्नानंतरचे नाव कुंदन मोहन पोटे | कुंदन मोहन पोटे, आशुतोष मोहन पोटे |
| १९ | ६ | ७०८/६ | गिरीचा मठ, चेंढरे | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चौ.फुट | महादेव विश्वनाथ गिरी | सुभाष मोतीराम गिरी, अनंत लक्ष्मण गिरी |
| २० | ४ | १९९३/१८ | ॲकॉन्स ट्रन्कूल अे.विंग, गोंधळपाडा | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चौ.फुट | ॲकॉन्स ट्रन्कूल तर्फे प्रोप्रायटर शर्मिला अरूण गुलाटी | प्रतीक्षा मंगेश कासार, मंगेश दिलीप कासार |
| २१ | २ | १८८ | नागडोंगरी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम चौ.फुट | श्रीमती.सुषमा विलास पाटील | श्री.राहुल विलास पाटील |
| २२ | २ | १६४०/२ | जय गजानन सोसायटी | आर.सी.सी.पक्के सिमेंट बांधकाम तळमजला ५९० चौ.फुट | संतोष धर्मा आंबेतकर | संकल्प मकरंद केळकर |

सही/-
**श्री.निलेश लक्ष्मण गावंड**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**

सही/-
**सौ.स्वाती सतिश पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत चेंढरे**
**ता.अलिबाग जि.रायगड**


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

■ श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग

■ बोअरवेल-विहिरीसाठी मशीनद्वारे अचूक भूजल संशोधन-९२२६७६६१२९

■ शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्वजातीय वधूवरांची नावनोंदणी ४८ शाखा, वेबसाईट नोंदणीसाठी -९२२६७६६१२९

■ 175 sq.ft दुकान गाळा, भाड्याने देणे आहे बे-वूड्स कॉम्प्लेक्स, गोंधळपाडा, अलिबाग ८८०५०२२३२०/८८०६३३१०००

■ प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५

■ 'इंद्रप्रस्थ' गोंधळपाडा येथे सफाईकामगार त्वरित पाहिजेत. कामाची वेळ सकाळी ९.३० ते सायं.६ भेटण्याची वेळ-सकाळी ११ ते सायं.५ ठिकाण- इंद्रप्रस्थ, गावदेवी मंदिराजवळ, गोंधळपाडा माहितीकरीता संपर्क : ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४.

■ कुकूचकू पोल्ट्री फार्म निजामपूर माणगाव रायगड येथे पिल्ले च्या पीक अप गाडीवर ड्रायवर पाहिजे पगार सर्व साधारण रूपये २५,००० प्रती महिना मिळेल कुटूंबासहित राहण्याची सोय आहे. संपर्क : अनुष्का राऊत ७७९८८८३८६४

■ क्षितीज बंगला, विद्यानगर (तांत्रिक विद्यालयामागे) 1BHK भाड्याने देणे आहे. (गाडी पार्किंग उपलब्ध) ९९६९८२८२३९/९२७२३८३४७६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे राजेवाडी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत सदरहू मिळकतींचे विद्यमान मालक श्री. अनिल दत्तात्रेय सिनकर रा. रामराज, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम खरेदीखताने विकत घेण्याबाबत ठरवले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे राजेवाडी, ता. अलिबाग, जि. रायगड**

| भूमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | पो.ख (हे.आर.चौ.मी) | आकारणी (रू.पै) |
|---|---|---|---|
| ४२/२ | ०-२९-१० | ०-०१-०० | ८.५६ |

तरी वर नमूद मिळकतीबाबत मिळकतीचे विद्यमान मालकांशिवाय अन्य कोणाही इसमाचा संस्थांचा साठेकरार, खरेदीखत, कुळवहिवाट, बक्षीसपत्र, मृत्युपत्र, वारसाहक्क, पोटगी, दान, गहाण, तारण, बोजा, भाडेपट्टा, आदलाबदलीचा करारनामा, जाणे-येणेचा वहिवाटीचा मार्ग अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांच्याकडे सादर कराव्यात. उक्त मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास सदरच्या मिळकती निर्वेध व बोजा विरहीत असून त्यांचे टायटल मार्केटेबल व क्लिअर आहे असे समजून आमचे अशिल मिळकतीचे विद्यमान मालकांबरोबर सदर मिळकतींच्या खरेदीविक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही. तसेच अशा प्रकारचा कोणाचाही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, तो त्यांनी जाणिवपुर्वक आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला आहे असे समजण्यात येईल याची याद्वारे सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
ता. २७/०४/२०२४

सही /-
**ॲड. शिरीष पद्माकर लेले**
'श्रीकृपा', भाऊ साहेब लेले चौक,
जुन्या नगरपालिकेसमोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर सुचना

सर्व लोंकाना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. आप्पा देहू माळी यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे मार्केवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं २९/२/ ब एकुण ०.८५ २० गुंठे जागा पैकी ०.२०.०० गुंठे विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हितसंबध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.
दिनांक २८/०४/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

# 'निवडणूक ड्युटी'

कोकणस्पंदन

**धनंजय शेट्ये**



शालेय कामकाजात थोडासा विसावा मिळतो न मिळतो तोपर्यंत निवडणूक ड्युटीचं आदेशपत्र येऊन धडकले. खरंतर शालेय शिक्षकांच्या शालाबाह्य आणि शालांतर्गत कामकाजाच्या ताणाची पुरेसी माहीती वरवर पाहता दिसून येत नाही.

मे महिन्यांमध्ये शालेय कामकाजाला वार्षिक विश्रांती असते. पण पेपर तपासणी, शालेय परीक्षेसाठीचं मुल्यांकन, रिझल्ट या सर्व गोष्टी शालेय ड्युटीमध्ये पूर्ण होऊ शकत नाहीत. ही सर्व कामे घरी घेऊन यावी लागतात.अर्थात घराचीही शाळाच बनलेली असते.कधी कधी पेपर तपासणी करतांना पूर्ण रात्रभर जागं राहुन वेळीच पेपर तपासणी पूर्ण करताना नाकेनऊ येतात. शिक्षकांची दिवाळीची सुट्टी इतर लोकांना दिसते पण पाचशे ते सहाशे पेपर तपासणी घरी घेऊन आलेले समाजाला दिसत नाहीत. ऐन सणासुदीच्या काळात पेपर तपासणी करत बसायचे.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पूर्तता करण्यासाठी अनेक सहशालेय उपक्रम राबविले जातात त्यावेळी शिक्षक जीव ओतून काम करत असतात. विशेषतः दरवर्षी विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती संकलित करून ती जतन करून ठेवावी लागते. गुणवत्तेचे चढ उतार लक्षात घेऊन उपाययोजना करणे हेही तितकेच महत्त्वाचे असते.

अभ्यासात मागासलेल्या विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करताना शाळेच्या कामकाजाच्या नंतरचा वेळ द्यावा लागतो. शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी आईबापांच्या भुमिकेतुन वावरत असतात. कधी बापाचा धाक तर कधी आईची प्रेमळ माया द्यावी लागते. विद्यार्थ्यांना आदर्श शिक्षक असतात त्यामुळे शिक्षकांकडूनही समाज तशीच अपेक्षा ठेवणार.

शालाबाह्य कामांबाबत शासनाची सक्ती असते ही खरी डोकेदुखी ठरत असते. निवडणूक ही देशाचं भवितव्य ठरविणारी यंत्रणा असते. सुशिक्षित वर्गच ही यंत्रणा योग्य पद्धतीने हाताळू शकतो त्यामुळे शासकीय कर्मचारी, शिक्षकांना निवडणूक ड्युटी लावली जाते. पण ही पूर्वसूचना एक दोन महिन्यांपूर्वी मिळाली तर बरे होऊ शकले असते.

मे महिन्याची सुट्टी म्हटले की बरेच शिक्षक चार महिने अगोदरच रिझर्व्हेशन करुन मोकळे झालेले असतात आणि एवढ्या अथक प्रयत्नानंतर आरक्षण मिळालेले असते आणि निवडणूक ड्युटीचं आदेशपत्र येऊन हातात पडतं. मग सर्वच बेतावर पाणी पडतं. आजचा महागाईच्या काळात विनाअनुदानित शाळांमध्ये तुटपुंज्या पाच सहा हजार मासिक वेतनावर काम करणारा शिक्षक जेव्हा हे शासनाचे निवडणूक ड्युटीच्या सक्तीच्या आदेशाचे पत्र पाहुन केवढा संताप येत असेल? ज्ञानदान करणारा शिक्षक समाजाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी झटणारा शिक्षक पाच सहा हजार रुपयांमध्ये आपले कुटुंब कसे चालवत असेल याची जाणीव शासनाला नाही का? मग अशा तुटपुंज्या पगारात काम करणाऱ्या शिक्षकांची शासनाला गरज निर्माण होते ती फक्त निवडणूकीच्या कामकाजासाठीच! मग त्यांच्या शालाबाह्य कामांबाबत सेवा घेऊन झाल्या की उसाच्या चोथ्याप्रमाणे फेकून दिले जाते.

खासगी शाळेतील शिक्षक तर दोन्ही बाजूनी किक खात असतात. संस्थाचालक गुणवत्तेसाठी प्रचंड मेहनत करुन घेतात आणि आजच्या विद्यार्थ्यांचे पालकही आपल्या पाल्यांमध्ये गुणवत्ता नसतानाही उगाच भपकेबाजपणा, दिखाऊपणा करतात आणि गुणवत्तेची भ्रामक सुज उतरली की शिक्षकांना दोष देत फिरत असतात.

मग अभ्यास न करणारी मुलं खोटी गुणवत्ता भासविण्यासाठी शिक्षकांच्या अध्यापन क्षमतेवर बोट ठेवतात. नाहक शिक्षक इथे भरडला जातो.

शिक्षकांना समाजात प्रतिष्ठा आहे, मानसन्मान आहे पण जगण्यासाठी पैसा लागतोच ना! पैशाचं सोंग आणता येत नाही. शालेय गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्नशिल असतानाच मग शासनाची शालाबाह्य कामे अंगावर येऊन पडतात. अनुदान मिळेल कायमस्वरूपी नोकरी होईल या एका आशेच्या किरणासांठी शिक्षक शालाबाह्य कामांबाबत उदासिनता असतानाही नकार दर्शवू शकत नाही. शिक्षक आणि त्यांना दिली जाणारी अशैक्षणिक कामे हा अनेक वर्षांपासून चर्चेत असलेला विषय आहे. अशैक्षणिक कामांवर बहिष्कार टाकतात, काही वेळा शासन निर्णय बदलते किंवा काही वेळा सक्तीने अशी कामे शिक्षकांना करावीच लागतात. **



मोहोर

**खार जमिनी विकास कायदा, १९७९ हा ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांना लागू आहे. या चार-पाच जिल्ह्यांत खार जमिनी विकास कायदा, १९७९ नुसार खारभुमि विकासाचे जेवढे पण जे प्रोजेक्ट राबवले गेले आहेत ते फक्त शेतीसाठीच राबवलेले आहेत. खारभूमि साठीचे सर्व प्रोजेक्ट कृषक कामासाठीचे आहेत कुठेही ते अकृषिक कामासाठी राबवलेले नाहीत.**

# १९७९ च्या कचाट्यातून अनेक गावांच्या जमिनी वाचवू शकेल

**राजन झेमसे**

समुद्राच्या खाऱ्या पाण्यापासून शेतीचे संरक्षण करण्याचा खारभूमिचा कायदा १९७९ आहे. जो आपल्या समाजाचे दुरदृष्टीचे नेते स्व. बॅ.ए.टी. पाटील साहेबानी म्हणजेच आपल्या बाबांनीच हा कायदा आपल्या जमिनींच्या संरक्षणासाठी तयार करून तो राज्यशासनाकडून १९ फेब्रु १९७९ ला संमत करून घेतला आहे.

राज्य शासनाने, स्वतः बंधारे बांधून व इतर कामे करून, ती सुस्थितीत राखून त्याद्वारे खार जमिनींचे संरक्षण, विकास करणे, त्यावर नियंत्रण ठेवणे व भरतीच्या पाण्याखालील जमिनींचे पुनःप्रापण करणे यासाठी आणि त्यावर अधिक अन्नपिके काढणे सुलभ होण्यासाठी तसेच इत्तर विवक्षित बाबींसाठी अधिक चांगली तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र खार जमिनी विकास अधिनियम, १९७९ करण्यात आलेला आहे.

या कायद्याचा आधार शेतकऱ्यांनी घेतला तर च्या नवनगर प्रारूपाला परतुन लवणे शेतकऱ्यांच्या एकजुटीला सहज शक्य होईल असे वाटते.

खार जमिनी विकास कायदा, १९७९ हा ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी, सिंधूदुर्ग जिल्ह्यांना लागू आहे. या चार-पाच जिल्ह्यांत खार जमिनी विकास कायदा, १९७९ नुसार खारभुमि विकासाचे जेवढे पण जे प्रोजेक्ट राबवले गेले आहेत ते फक्त शेतीसाठीच राबवलेले आहेत. खारभूमि साठीचे सर्व प्रोजेक्ट कृषक कामासाठीचे आहेत कुठेही ते अकृषिक कामासाठी राबवलेले नाहीत. खार भुमिचा खार जमिनी विकास कायदा, १९७९ हा कायदाच शेती संरक्षणासाठी व शेतकऱ्यांना अधिक अन्नपिके घेण्यासाठीचा, शेती संरक्षणाचा हा कायदा कृषीसाठी असल्यामुळे इथे खारभूमी क्षेत्रामध्ये कुठेही अकृषीक कामे होता कामा नयेत हे सर्वांनीच या ठिकाणी लक्षात घेण्याची अवश्यकता आहे. त्यामुळे उरण पासून पेण पर्यन्तच्या १२४ गावांतिल अनेक गावांच्या जमिनी नवनगर प्रारूपा मधुन वाचवल्या जावू शकतात किंवा वगळल्या जावू शकतात. खारभूमी विकास योजनेत समावेश झालेल्या जमिनीत शेती व शेतीपुरक व्यवसाया व्यतिरक्त व्यवसाय करता येवू शकत नाहीत. १९७९ च्या खारभूमी कायद्याच्या प्रस्तावनेतच हा कायदा फक्त कृषी उत्पन्नात वाढ होण्यासाठी बनवला आहे असे म्हटले आहे. त्यामुळे खारभूमि विकास क्षेत्रात समाविष्ठ गावांतिल शेतजमिनी नागरीकिकरण तथा औद्योगिकीकरणासाठी सद्याच्या कोणत्याही प्रस्तापित कायद्याने शेती व शेती पूरक व्यवसायाच्या व्यतिरिक्त कारणासाठी वर्ग होवू शकत नाहीत. याचा आधार घेवून ला परतुन लावणे सहज शक्य आहे. आपल्या लोकप्रतिनिधींनी, जनतेच्या मतांवर निवडून जाणाऱ्यांनी शेतकऱ्यांवर, शेतकऱ्यांच्या घरादारावर आणि शेतकऱ्यांच्या सुपिक जमिनीवर आलेलेचे हे संकट दुर करण्यासाठी शेतकऱ्यांच्या सोबत राहुन प्रयत्न केले पाहिजेत. नवनगर प्रारूपासाठी १२४ गावांतिल अनेक गावच्या जमिनी खारभूमी कायद्याने शेती, शेतीपुरक व्यवसायासाठी संरक्षीत आहेत तर अनेक गावांच्या जमिनी हेटवणे सिंचन क्षेत्रात समाविष्ठ असलेल्या सिंचनासाठी आरक्षीत असलेल्या शेत जमिनी आहेत हि बाब लक्षांत घेवून, आपल्या लोकप्रतिनिधिंनी सरकारला हे ठणकावून सांगून नवनगर प्रारूपाला आपल्या सर्व लोकप्रतिनिधींनी विरोध नोंदवला पाहिजे. जुने कायदे फाट्यावर मारुन ला या परिसराचा विकास करायचा असेल तर तो शासनाने, शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानुनच तसा विकास केला पाहिजे. शेतकऱ्यांच्या पूर्वजांनी केवळ शेतजमिनींवर त्यांच्या पिढ्यान-पिढ्या सन्मानाने जगवल्या, पोसल्या तशाच शेतकऱ्यांच्या पुढच्या सर्वच पिढया या शेतीमुळे जगल्या पाहिजेत, पोसल्या गेल्या पाहिजेत असे विकासाचे मॉडेल सरकारने तयार केले पाहिजे. शेतकऱ्याचे ॲसेट शेतकऱ्यांच्या नावे कायम राहुन विकास होत असेल व शेतकऱ्यांना कायम स्वरूपी मोबदला, कायम आणि पिढ्यान-पिढया मिळत राहील अशा प्रकारचे विकासाचे मॉडेल असेल तर त्याचा शेतकरी नक्कीच स्वागत करतील. सर्व सामान्य शेतकऱ्यांना पैसा वापरण्याची व पैशात वाढ करण्याचे, स्वतःचा आर्थिक विकास करण्याचे ज्ञान नसल्याने यापुर्वी जमिन विकून धनाढ्य बनलेल्या शेतकऱ्यांच्या संपत्तीत वाढ झालेल्या शेतकऱ्यांची संख्या नगण्य आहे, मात्र जमिनी विकून किंवा जमिनी संपादन झाल्या कारणाने देशाधडीला लागलेल्या शेतकऱ्यांची संख्या प्रचंड आहे आणि हे खरे वात्सव आहे.

आपल्या पुर्वजांनी आपल्यासाठी अनेक हाल-अपेष्टा भोगून या जमिनी राखून ठेवल्या आहेत. या जमिनीच आपल्या पुढच्या पिढ्यांचे शाश्वत भविष्य म्हणून शेतकऱ्यांच्या या जमिनी कायम त्याच्या नावे त्याच्या ताब्यात राहिल्या पाहिजेत अशी विचार सरणी प्रत्येकाचीच असायला हवी. सरकारला अपेक्षीत, त्यांच्या मनाप्रमाणे विकास साधायचा असेल तर सरकारने देखिल शेतकऱ्यांची बाजू समजुन घेतली पाहिजे. शेतकऱ्याला केंद्र बिंदू मानुन विकासाचे मॉडेल तयार गेले पाहिजे. शेतकऱ्याचे पुढील पिढ्यांचे नुकसान न होता विकास होत असेल, शेतकऱ्याचे ॲसेट शेतकऱ्याच्या नावावर राहुन विकास होत असेल तर त्यावर विचार होण्याची आणि वेळ आलीच तर चर्चा होण्याची अवश्यकता आहे.**



**लोकसभा निवडणुका सुरु आहेत. विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व कळावे या उदात्त विचारातून व पालकांनीही मतदानास चांगला प्रतिसाद द्यावा याकरिता शिक्षकांच्या माध्यमातून मतदार जनजागृती अभियान रॅली काढण्यात येत आहेत. मतदानाच्या दिवशी सुट्टी म्हणून बाहेर फिरायला न जाता, घरी न थांबून मतदान करावे, अशी भावनिक साद घररॅलीच्या माध्यामातून घालण्यात आली. यासाठी शहरातील शाळा, विद्यार्थी जनजागृती करत असून मतदानाचे महत्त्व नागरिकांना पटवून देत आहेत.**




# मतदान करण्यापुर्वी आमचा विचार होणार काय?

**अंकुश शिंगाडे**

मतदान करतांना आमचाही विचार व्हावा. लहान मुलांची खंत. त्यांनाही वाटतं की आम्हालाही मतदान करता,यावं. परंतु तसं मतदान करण्याचा त्यांना अधिकार नाही. कारण ते अठरा वर्षाचे नसतात व त्यांना देश चालविण्यासाठी कोणाला निवडून द्यायचं हे साधं कळत नाही. याचा अर्थ असा नाही की त्यांच्याही काही मागण्या नसतात? त्यांच्याही मागण्या असतात. त्या मोठ्यांना कळत नाहीत. म्हणूनच कधीकधी देशाचं अहितही होत असतं. देशात घोटाळे होत असतात. कारण जेवढं लहाण्यांना कळतं. तेवढं मोठ्यांना कळत नाही. ते आपल्या निवडून आणलेल्या नेत्यांवर वचक ठेवत नाहीत. म्हणूनच असं घडतं. उदाहरणार्थ आपला मोबाईल. आपला मोबाईल आपल्याला तरी समजून घ्यावा लागतो. लहान मुलांना नाही.

लहान मुलांनाही भावभावना असतात त्यांनाही मतदानाचं कळत नाही असं नाही. त्यांनाही मतदानाचं कळतं व ते आपल्या घरी एखाद्या पक्षाचं नाव जोरात घेत असतात. तसा त्या नेत्यांचा सर्वात जास्त प्रचार हीच लहान मुलं करतात. कारण त्यांचेवर बंधन नसतं. कोणताच कायदा त्यांना अडवू शकत नाही वा असं बोलला, तसं बोलला म्हणत नाही. तसं पाहिल्यास तेच निवडणुकीत सर्वात जास्त काम करीत असतात. जरी म्हटलं जातं की राजकारणापासून मुलांना दूर ठेवायला हवं.

अलिकडे लोकसभेची निवडणूक होवू घातली आहे व सर्वांनाच निवडणूकीचा रंग चढला आहे. यात बरेचसे नेते असे आहेत की जे आश्वासनच देत आहेत आणि या लहान मुलांना निवडणुकीतून वंचित ठेवावं असं सरकार जरी म्हणत असलं तरी मतदार जनजागृती करीत असतांना याच मुलांच्या हस्ते मतदान करण्यासाठी संकल्प आवेदन पत्र पालकांकडून भरुन घेवून प्रत्यक्षात नसेल तरी अप्रत्यक्षपणे या लहान मुलांचा निवडणुकीत सहभाग घेतलेलाच आहे. त्यामुळंच त्यांचं जर स्थान निवडणुकीत अप्रत्यक्षपणे आहे तर त्यांच्याही मागण्यांकडे दुर्लक्ष करु नये. त्यांच्याही मागण्या असतात. ते नेत्यांनी समजून घ्यायला हवं.

आता मोठी माणसं विचार करतील की लहान मुलांच्या मागण्या कोणत्या असतील? खाणं पिणं हे तर मायबापच पुर्ण करतात. वरुन शिक्षणही मायबापच पुर्ण करतात. मग त्या मुलांच्या मागण्या कोणत्या असतील? होय, शिक्षणच. चांगलं शिक्षण ही लहान मुलांची मागणी आहे. मग चांगलं शिक्षण त्यांना मिळत नाही काय? मिळतं, त्यांनाही चांगलंच शिक्षण मिळतं. परंतु शिक्षणात जो भेदभाव आहे ना. अलिकडील काळात गरीबांची मुलं ही जिल्हा परीषदच्या शाळेत शिकत असतात. तर श्रीमंतांची मुलं कॉन्व्हेंटच्या शाळेत. अशावेळेस गरीबांच्या मुलांनाही वाटत असतं की त्यांचंही शिक्षण कॉन्व्हेंटला व्हावं. त्यांनाही कॉन्व्हेंटला शिकता यावं. परंतु, असे होत नाही व कोणताच नेता असे करीत नाही. तसेच कोणतेच मायबाप ती मागणी मतदान करतांना लावून धरत नाहीत. ज्यामुळं नेत्यांना जाग येईल. शिवाय ती लहान मुलंही आपल्या मागणीनुसार आंदोलन करुच शकत नाहीत. कारण ती लहान असतात. आंदोलन वैगेरे त्यांना काही कळत नसतं. परंतु ती जसजशी मोठी होतात. तसतसा हाच भेदभाव त्यांच्या मनात वाढीस लागत असतो. निवडणूकीच्या बाबतीत सांगायचं झाल्यास कोणताच नेता हा लहान मुलांची मागणी पुर्ण करीत नाही वा त्याबाबत आश्वासन देत नाही. त्याचं कारण आहे की कोणताच लहान मुलगा हा मतदानाच्या कक्षेत मोडत नाही व त्याला मतदान करता येत नाही व त्याला मतदान करण्याचा अधिकारही नाही. मात्र नेतेही त्याबाबत बोलणं करीत नसतात. याबाबतीत एक प्रसंग सांगतो. एक नेता बोलत होता विचारपीठावर. मोठमोठी आश्वासनं देत होता. तसंच म्हणत होता की देशात एकच करप्रणाली ठेवू.

एकच करप्रणाली ठेवू. सारेच तसे बोलत असतात नेते. परंतु कोणताच नेता असे बोलत नाही की देशातील मुलांसाठी एकच शिक्षण पद्धती ठेवू. सर्वांना निःशुल्क शिक्षण पद्धती ठेवू. मग ते महाविद्यालयीन शिक्षण का असेना. डॉक्टर, इंजिनिअरचं किंवा एखाद्या उद्योगाचं शिक्षण का असेना. परंतु तसा कोणताच नेता बोलणार नाही आणि करणारही नाही. याचं कारण असंच समजायला काही हरकत नाही की गरीबांच्या मुलांमध्ये महत्वाकांक्षा जरी असली तरी त्यांना मोठं होवू द्यायचं नाही. त्यांना डॉक्टर, इंजिनिअर जरी बनायचं असलं तरी त्यांच्याकडे पैसे नसल्यानं ते डॉक्टर, इंजिनिअर बनू शकणार नाही वा कोणत्याच मुलांना त्यांच्यात कुवत असतांनाही कोणतंच पैशाचं शिक्षण घेता येणार नाही. हं मोठमोठी आश्वासनं नक्कीच दिली जातील प्रत्येक निवडणुकीत. करप्रणालीही एकच आणली जाईल प्रत्येक निवडणुकीत. देशातील रस्त्यांचाही विकास केला जाईल. देशात सोयसुविधा चांगल्या केल्या जातील. प्रत्येकाला अन्नधान्य मोफत मिळेल. मग गरीब असला तरी. परंतु शिक्षण मोफत मिळणार नाही. त्यासाठी कोणी आंदोलन करणार नाही. ती आपली बाब नाही असं समजून ती जबाबदारी झटकणार आणि हेच होत आलंय आजपर्यंत. त्याचं कारण आहे नेत्यांच्या शाळा असणं. त्या शिक्षणसंस्थांमधून भरमसाठ पैसा कमवता येणं. अशाच शिक्षणसंस्थांमधून आजपर्यंत भरमसाठ पैसा कमवता आल्यानं नेते मालामाल बनले. कारण यावर कोणताच मतदार आजपर्यंत बोलला नाही. त्याला कळलं नाही. अन् कोणी कळूही दिलं नाही. शिक्षण वाघिणीचं दूध आहे असं बाबासाहेबांनी म्हटलं परंतु ते निःशुल्क नसल्यानं गरीबांपर्यंत पोहोचेल तेव्हा ना. ते गरीबांपर्यंत पोहोचतच नाही. मग गरीब मंडळी गुरगुरणार कशी? ती निपचीत असतात मेंढरांसारखी. निवडणूक आली की एक पाव पितात. पाचशेची नोट घेतात. मतदान करतात व पुन्हा जैसे थे होवून पाच वर्षपर्यंत मेंढरांसारखीच गप्प राहतात. त्यांना माहीतही नसतं की यातील काही नेते हे त्यांच्यावर एखाद्या वाघ, सिंहासारखी झडप घालतात व त्यांना नेस्तनाबूत करतात. महत्वपुर्ण गोष्ट ही की इथं कुत्र्यालाही किंमत आहे. तीन ते वीस हजार रुपये. परंतु माणसाला नाही की जी मंडळी एका पव्व्यात व पाचशेच्या नोटेत समाधानी होतात. काल हाच दर शंभर रुपये होता.

नेते आपल्याआपल्या पद्धतीनं आश्वासन देत आहेत. ते लोकांना लुभावण्याचे प्रयत्न करीत आहेत. तसं पाहिल्यास प्रत्येक नेताच आश्वासन देत असतो. त्यानंतर निवडणूक झाली आणि ते निवडून आले. त्यानंतर त्यांनी त्या दिलेल्या आश्वासनाची परिपुर्ती नाही केली तरी चालेल. परंतु प्रत्यक्षात प्रत्येक नेताच आश्वासन देत असतो. हेच प्रत्यक्षात घडत असतं. आश्वासन...नेते मंडळी कोणतं आश्वासन देतात आणि ते कोणाला देतात? याचा विचार केल्यास निश्चीतच आपल्याला माहीत पडेल की नेते मंडळी आश्वासन हे आपल्यापेक्षा मोठ्या असणाऱ्या मतदार मायबापाला देत असतात. जे प्रत्यक्षात मतदार असतात. वेळप्रसंगी ते पायापोटीही लागत असतात. म्हणतात की आशीर्वाद द्या. परंतु एकदा का निवडून आले की ढुंकूनही पाहात नाही मतदारसंघात. मला आशीर्वाद देणारा माझा मतदार बंधू कसा आहे? तो सुखी समाधानी आहे की नाही? हेही कोणी पाहायला येत नाहीत. नेता...नेता असा असावा की त्यानं स्वाभीमानी असावं. त्याचं कार्य वाखाणण्याजोगंच असावं. त्यानं असं काम करावं की पाच वर्षानंतर त्याला मतदारांना लुभावण्यासाठी प्रयत्न करावा लागू नये. त्याला पाच वर्षानंतर बोलावंच लागू नये की त्यानं काय काय केलं. त्यानं असं चांगलं काम करावं की जे मतदाराला दिसावं व त्या मतदारानं त्याच चांगल्या कामाच्या बदल्यात मतदान करावं कोणताही मनात किंतू परंतु न ठेवता.

अलिकडील काळात असे नेते नाहीतच. अशा नेत्यांची वाणवा आहे. म्हणूनच अशा नेत्यांना प्रचारासाठी निघावं लागतं. प्रचारसभा घ्याव्या लागतात व मतदाराला निक्षून सांगावं लागतं की बाबांनो, मी तुमच्यासाठी अमूक अमूक काम केलं. कारण त्या नेत्यांना वाटतं की मतदार हे आंधळे आहेत व ते आंधळे असल्यानं माझी केलेली कोणतीच चांगली कामं त्यांना दिसली नाहीत.

नेते हे चांगली तशीच वाईट कामं करीत असतात. चांगली कामं ही वाखाणण्याजोगीच असतात की त्या भरवशावर ते निवडून येत असतात आणि वाईट कामं अर्थात घोटाळे करणं. त्या घोटाळ्याची शंका मनात असल्यानं ते पडतही असतात निवडणुकीतून. काही असे घोटाळे करुनही तरतात. त्याचं कारण असतं त्यांचं चांगलं काम करणं. एखाद्या नेत्यानं आपल्या मतदारसंघात जर चांगले कामं केले की बस. त्यानं कितीही प्रमाणात उच्च कोटीचे घोटाळे केले असले आणि विरोधक कितीही प्रमाणात त्या घोटाळ्यावर बरळत असले तरी ते निवडून येतात निवडणुकीत. त्याचं कारण असतं. त्याचं वागणं. तो नेता आपल्या मतदारसंघात अगदी सहानुभूतीपूर्वक वागणूक देत असतो आपल्या मतदारांना. त्यांच्या सुखदुःखात धावून जात असतो आवडीनं. त्या क्षेत्राचा विकास करीत असतो आणि त्या भागातील मतदारांना खुश ठेवत असतो. त्या नेत्याला जास्त सांगायची गरजच राहात नाही आपल्या मतदारसंघात. असे नेते घोटाळेबाज जरी असतील तरी आपल्या मतदारसंघाशी प्रामाणिक वागत असल्यानं मतदारसंघात भरपूर अशा फरकानं निवडून येत असतात. असे नेते आपल्या क्षेत्रातील जनतेसाठी देवच असतात. त्याचं कारण असतं, त्याचं विकास करणं व त्याचं प्रामाणिक असणं. असे बरेचसे नेते निवडून आले आहेत. नेत्यांना तसं पाहिल्यास आश्वासनच द्यावं लागू नये. परंतु दर पाच वर्षानं त्याला जनतेसमोर जावं लागतं व आपण केलेल्या कार्याचा पाढा वाचावा लागतो. तो पाढा वाचतो. तरीही तो पडतो. कारण ज्या पाण्याचं तो वाचन करतो. त्या पाढ्यात पुरेसंही सत्यत्व नसतं. केवळ भोपाली असते.

देशात भ्रष्टाचार होतात. बरेचसे नेते जनतेशी प्रामाणिक वागत नाहीत. बेईमानी पद्धतीनंच वागतात. ते जनतेला आंधळी आहे असं समजतात. ते भ्रष्टाचार करतात, ते जनतेला आंधळी आहे असं समजूनच. त्यानंतर ते अप्रामाणिक वागतात जनतेशी. तेही जनतेले आंधळी आहे असं समजूनच. परंतु जनता आंधळी नसते.

जनता ही जनार्दन असते. ती पाच वर्षपर्यंत त्या नेत्याचं वागणं लक्षात घेते. मग तो नेता कितीही बरळला तरी जनता ही पाच वर्षानंतर होणार असलेल्या निवडणुकीत नेत्याला धडा शिकवतेच. अलिकडील काळात आश्वासनाचा जोर आहे. जनता ही कितीही डोळस असली तरी याच जनतेतील काही लोकं नेत्याला जाब विचारत नाहीत आणि आंधळंपणाचा बुरखा ओढून मतदान करते व फसते. ही देखील निवडणूक अशीच आहे. बरेचसे नेते जरी जनतेशी पाच वर्षपर्यंत जनतेशी प्रामाणिक वागले नसले तरी असे आश्वासनं देत आहेत की जसे तेच नेते एकमेव प्रामाणिक वागले व त्यांनी बरीचशी विकासाची कामे केली. परंतु विकास करणाऱ्याला सांगण्याची गरज नसते. कोण कसा हे जनतेला सारं समजतं. त्यानुसार मतदान करतांना जनता आपल्या अडचणींचा विचार करते. आपल्याला तर मतदान करायचा अधिकार आहे ना.

आपल्याला तर कळतंय ना की कोणता नेता आपल्या आणि आपल्या मुलांच्या मागण्या पुर्ण करु शकतो. मग जो नेता शिक्षण निःशुल्क करण्याच्या गोष्टी करीत असेल वा गरीब मुलांच्या शिक्षणाची व्यवस्था निःशुल्क पद्धतीने करुन देण्याचं आश्वासन देत असेल व जो त्या आश्वासनाची परिपुर्ती करणारा वाटत असेल. त्यालाच मतदान करायचं. कारण लहान मुलं आपली स्वतःची मुलं जरी असली तरी त्यांना मतदानाचा हक्क नाही. त्याचं कारण म्हणजे ते अठरा वर्षाचे नाहीत. मग त्यांचं कोण ऐकणार? नेतेही जो मतदानाच्या कक्षेत मोडतो. त्याचाच विचार करुन त्यांचंच ऐकत असतो. परंतु आपण पालक तर सुज्ञ आहोत ना. आपण त्याचा विचार करावा व तसाच विचार करुन मतदान करावं. जेणेकरुन प्रत्येक गरीबांच्या मुलाला डॉक्टर, इंजिनिअर बनता येईल. उद्योगाचं शिक्षण निःशुल्क घेता येईल व आपलंही जीवन सुखी, समाधानी करता येईल. शिवाय शिक्षणात मुलांसमोर तरी हा कॉन्व्हेंटचा व हा जिल्हा परीषदचा असा भेदभाव होणार नाही हे तेवढंच खरं. **

# देश सत्ता परिवर्तनाच्या उंबरठ्यावर

डी-CODE
आविष्कार देसाई

देशात पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात नुकतेच मतदान झाले आहे. मतदानाची टक्केवारी पाहीली, तर सुमार मतदान झाल्याचे दिसते. अलिकडच्या २०-२२ वर्षाच्या कालावधीचा विचार केल्यास कमी मतदानाच्या टक्क्यांचा फटका बसून भाजपा सत्तेवरुन पायउतार झाले आहे. मात्र, त्याचा फायदा हा काँग्रेससह मित्रपक्षांना झाला आहे. घटलेल्या मतदानाच्या टक्केवारीमुळे भाजपाचे कमळ ज्या चिखलाच रुजले होते. तेथेच आता मोदींच्या विजयी रथाचे चाक रुतत चालले असल्याचे दिसत आहे. पुढील पाच टप्प्यात मतादन होणे बाकी आहे. मतदानाच्या घसरत्या आलेखाचा ट्रेंड असाच कायम राहील्यास देश सत्ता परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभा आहे असे म्हणणे अयोग्य ठरणार नाही.





देशभरात आता भाजपाला जनता कंटाळली आहे. मोदींनी सर्वसामान्यांसाठी काहीच केले नाही. गरीब हा आणखीन गरीब, तर श्रीमंत हा अजून श्रींमत होत आहे. युवकांच्या हाताला काम नाही, महागाईने, तर आजवरचे सर्व रेकॉर्ड ब्रेक केले आहेत. महिला सुरक्षीत नाहीत, देशाची अर्थव्यवस्था पार रसातळाला जात आहे. याबाबत आरबीआयचे माजी गव्हर्नर तथा अर्थतज्ज्ञ रघुराम राजन यांनी चिंता व्यक्त केली आहे.

धर्माच्या नावावर मत मागण्याचे दिवस आता भाजपा आणि आरएसएसला विसरावे लागणार आहेत. कारण जानेवारी महिन्यात राम मंदिराच्या उद्‌घाटनाचा महाइव्हेंट घेऊनही त्याचा फायदा भाजापाला होताना दिसत नाही. मोदींचे मजबुत गड असणाऱ्या बिहार (५३.०३ टक्के), उत्तरप्रदेश (५२.६४ टक्के), मध्यप्रदेश (५४.८३ टक्के), राजस्थान (५९.१९ टक्के) आणि महाराष्ट्रामध्ये (५३.५० टक्के) मतदानाची टक्केवारी घसरली आहे. या हिंदी भाषीक मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान केल्याचे दिसत नाही, उलट भाजपाच्या कार्यकर्ते आणि पदाधिकारी आपल्याच मतदारांना मतदान केंद्रापर्यंत नेण्यात सपशेल अपयशी ठरले आहेत.



उलट मोदींचा प्रभाव नसलेल्या अथवा कमी प्रभाव असलेल्या त्रिपुरा (७६.२३ टक्के), पश्चिम बंगाल (७१.०४), आसाम (७०.६६ टक्के), मनीपूर (७६.०६ टक्के) मतदान झाल्याचे दिसते. त्यामुळे हे चित्र अधिक स्पष्ट दिसत आहे.



२०१४ आणि २०१९ च्या लोकसभेत मोठ्या प्रमाणात मतदान करुन मतदारांनी मोदींना कौल दिला होता. आता मात्र, मोदी लाट कोठे असल्याचे दिसत नाही. पहिल्या टप्प्यात मतदान झाल्यावर मोदी-शहांसह आरएसएसची चांगलीच झोप उडाली आहे. मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी त्यांनी लागलीच बैठकांचे सत्र सुरु केले आहे. या बैठकीला मोदी, शहा, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते. मतदारांना मतदान करण्यासाठी बाहेर काढा, अशा सूचना कार्यकर्ते पदाधिकाऱ्यांना दिल्या जात आहेत.

१९९० साली भारत देशात लोकसभेसाठी ५९.९९ टक्के मतदान झाले होते. त्यावेळी भाजपाचे १८२ उमेदवार निवडून आले होते. त्यावेळी अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार आले होते. २००४ मध्ये ५८.०७ टक्के मतदान झाले, तेव्हा १३८ जागा भाजपाच्या निवडून आल्या होत्या. पुढे २००९ साली देशात ५८.२१ टक्के मतदान झाले तेव्हा भाजपाला फक्त ११६ जागांवर समाधान मानावे लागले होते. या वेळी काँग्रेससह मित्र पक्षाचे मनमोहन सिंह यांचे सरकार आले होते. त्यानंतर मोदी यांच्या नेतृत्वात भाजपा आणि आरएसएसने देशातील निवडणूका लढल्या होत्या. त्यावेळी मतदान भरभरुन झाले होते. २०१४ साली ६६.४४ टक्के मतदान झाल्याने भाजपाला २८२ जागा मिळाल्या होत्या, तर २०१९ मध्ये ६७.४० टक्के मतदारांनी मतदान केले तेव्हा भाजपाच्या बंपर ३०३ जागा निवडून आल्या होत्या. त्यावेळी मोदी लाट होती हे दिसून येते. अधिक मतदान झाल्याचा फायदा मोदी आणि भाजपाला झाल्याचे आकडेवारीवरुन दिसून येते. २०२४ निवडणूकीत मतदारांनी पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यात कमी संख्येने मतदान केले आहे. त्यामुळे असाच ट्रेंड तिसऱ्या (७ मे), चौथ्या (१३ मे), पाचव्या (२० मे), सहाव्या (२५ मे) आणि सातव्या(१ जुन) टप्प्यातील मतदानात राहील्यास मोदी सरकारला सत्तेच्या सिंहासनावरुन पाय उतार व्हायला वेळ लागणार नाही.

**मोदी आणि योगी यांच्यामधील शीतयुध्द**

योगी को बचाना है, तो मोदी को हराना है, असा नारा उत्तरप्रदेशात योगी समर्थक देत आहेत. या ठिकाणी सर्वाधिक ८० जागा आहेत. त्यामुळे मोदींना रोखण्याची तयारी येथून केली गेली नाही ना असाही प्रश्न उपस्थित होतो. मी उत्तरप्रदेशातील खासदार असलो तरी, माझे मुख्यमंत्री योगी आहेत, असे भर सभेत सांगण्याची वेळ मोदींवर का आली. याकडे गांभिर्याने पाहण्याची गरज आहे. **

## प्रेरक आणि वाचनीय

# परीघ ओलांडताना

प्रा.शाम जोगळेकर
मो. ९२७३३४३१७७

"परीघ ओलांडताना" हे सुरेश पळसोदकर यांचे आत्मचरित्र पुण्याच्या उत्कर्ष प्रकाशनने देखण्या स्वरूपात प्रकाशित केले आहे. या पुस्तकाला "परीघ ओलांडलेले प्राचार्य" या शीर्षकाची प्राचार्य शिरीष चिंधडे यांची सविस्तर प्रस्तावना लाभली आहे. त्यांच्या मते, प्राचार्य डॉ. सुरेश पळसोदकर यांनी उच्च शिक्षण क्षेत्रात चाळीस वर्षे प्राध्यापक, संघटक कार्यकर्ता, विविध समित्यांचे सदस्य आणि प्राचार्य म्हणून महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या विभागांत काम केलेले आहे. सजग, तटस्थ आणि नि:स्पृह राहून सेवा केलेली आहे. त्या अनुभवांचे, निरीक्षणांचे सच्चे आणि अनलंकृत प्रतिबिंब परीघ ओलांडतानाच्या लेखनात आढळते. सुरेश यांनी आपले "मनोगत" थोडक्यात मांडले आहे. प्राध्यापकाचा पेशा स्वीकारल्यावर त्यांनी काही काळानंतर तडजोडी न करता, नव्या अज्ञात प्रदेशाची वाट चोखाळणे आणि अपरिचित आव्हानांना सामोरे जाण्याचा पर्याय स्वीकारला. आपल्या जीवनातील सहा दशकांच्या कालखंडातील शिक्षण क्षेत्रातील आलेले अनुभव त्यांनी या पुस्तकात मांडले आहेत. पुस्तकाचे रंगीत, साधेसे आणि समर्पक मुखपृष्ठ गिरीश सहस्रबुद्धे यांचे आहे. एकूण बारा प्रकरणांतून हे आत्मचरित्र वाचकांसमोर उलगडते.




सुरुवातीच्या दोन प्रकरणांत लेखकाने आपले बालपण, कौटुंबिक परिस्थिती, शिक्षण याविषयी आपल्या आठवणी मांडल्या आहेत. आजच्या तुलनेने तेव्हाचे ग्रामीण भागातले सामाजिक वातावरण सामंजस्याचे होते. गरिबीमुळे काटकसरीने जगण्याची सवय लागली, याचा भविष्यात उपयोग झाला असे लेखकाने नोंदविले आहे. खामगावला बी.कॉम पर्यंतचे त्यांचे शिक्षण झाले. कॉलेजमधील शिक्षण, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, सावरकर विचारांची ओळख, घरातील जाणवणारे आर्थिक प्रश्न या त्यावेळच्या आठवणी वाचनीय झाल्या आहेत. मेहुण्यांमुळे सुरेश यांना रायपूरला एम. कॉम.चे शिक्षण घेता आले. मेहकरमध्ये त्यांनी तीन वर्षे प्राध्यापक म्हणून काम केले. त्यावेळचे अनुभव सविस्तरपणे नोंदविले आहेत. तेथील साहित्याला पूरक वातावरणात सुरेश यांचे कथालेखन बहरले होते.

१९६९ मध्ये सुरेश यांची कोकणातील अलिबागच्या जेएसएम कॉलेज मध्ये 'असिस्टंट प्रोफेसर इन कॉमर्स' या पदावर, मुलाखतीनंतर नियुक्ती झाली. त्यावेळेच्या कुलाबा जिल्ह्यातील विविध घडामोडींचे त्यांच्या लिखाणातून उत्तम दर्शन घडते. अलिबागमधील आणि भवतालच्या बदलत्या सामाजिक जीवनाचे त्यांनी उत्तम वर्णन केले आहे. जेएसएमचे पहिले प्राचार्य रा.तु.कुलकर्णी यांच्या व्यक्तिमत्त्वाचे, कार्याचे त्यांनी उत्तम निरीक्षण केले होते. त्यांच्या विलक्षण प्रभावाचा त्यांच्या भावी जीवनात त्यांना वेळोवेळी उत्तम उपयोगही झाला होता. अलिबागमध्ये त्यांचा अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेशी संबंध आला. आणीबाणीतील त्यासंबंधीचे कार्य, आणीबाणीविरोधी आंदोलनातील पु. ल. देशपांडे, दुर्गा भागवत, प्रा. द. मा.मिरासदार यांची व्याख्याने अलिबागला पळसोदकर यांच्या पुढाकाराने झाल्याने, आणीबाणी विरोधी वातावरण निर्माण करण्यास मदत झाली. प्राचार्य रा. तु. कुलकर्णी यांच्या निवृत्तीनंतर कॉलेजमधील नवी व्यवस्थापन व्यवस्था निर्माण होतानाचे विविध अनुभव सविस्तरपणे मांडले आहेत. त्यानंतर सुरेश यांना अलिबागला राहू नये असे वाटू लागले. यूजीसीची फेलोशिप प्राप्त झाल्याने, कामगारांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक लाभांचा आणि उत्पादकतेचा संबंध या विषयावर डॉ. मनोहर आपटे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पीएच.डी. पूर्ण केली. त्यावेळचे विविध अनुभव सुरेश यांनी लिहिले आहेत.

इंद्रायणी महाविद्यालयात तळेगाव-दाभाडे येथे पाच वर्षे आणि नंतर निवृत्तीपर्यंत गरवारे महाविद्यालयात डॉ. पळसोदकर यांनी पुण्याला प्राचार्यपदावर काम केले. त्यावेळेचे विविधरंगी अनुभव त्यांनी उत्तम प्रकारे शब्दबद्ध केले आहेत. 'नवे प्रयोग, नवी आव्हाने' हे प्रकरण सुरेश यांची प्रयोगाशीलता स्पष्ट करते. प्राचार्य संघटनेद्वारे देशभरातील प्राचार्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम घेण्यात त्यांनी यशस्वी पुढाकार घेतला. 'सारासार विचार' या प्रकरणातून त्यांनी आपल्या जीवनाचा मागोवा घेतला आहे. शिक्षण क्षेत्रातील त्यांची कामगिरी वाचतानाच त्यांच्या सुखी आणि यशस्वी कौटुंबिक जीवनाचीही उत्तम ओळख या पुस्तकातून होते पुस्तकातील विविध छायाचित्रे त्याची उत्तम साक्ष देतात. शिक्षण क्षेत्राविषयी त्यांचे विविध अनुभव आणि निरीक्षणे वाचकाला चिंतनप्रवृत्त करतात. त्यांची उत्तम लेखनशैली वाचकाला पुस्तक पूर्णपणे वाचण्यास प्रवृत्त करते.

पुस्तकातील काही सदोष तपशील पुढीलप्रमाणे हवे होते. साठच्या दशकात ईबीसी मर्यादा वार्षिक बाराशे रुपये होती (पृ. ३३,३४). जेएसएमची स्थापना १९६१ साली झाली. पळसोदकर अलिबागला त्यानंतर आठ वर्षांनी आले(६१). छत्रपती शिवाजी महाराजांनी १६७८ मध्ये कुलाबा किल्ल्याची निर्मिती केली. कुलाबा म्हणजे कुल+आप (६२).

**पुस्तकाचे नाव : परीघ ओलांडताना लेखक : सुरेश पळसोदकर**
**प्रकाशक : उत्कर्ष प्रकाशन, पुणे - ४.**
**प्रथमावृत्ती : २६ जानेवारी २०२४.**
**पृष्ठे : २०७, मूल्य : रु.३००/-**

# "निसर्ग, अपुला सगा सोयरा"

दीपक घाणेकर

आज मी परसदारीच्या बागेत किलबिल करणाऱ्या पक्षी गणांचा आणि हरीतपर्णी वृक्षवल्लींचा निरोप घेत होतो. आजवर कित्येक शुक्रवार मी त्यांच्या सहवासात चहाचे घुटके घेत, सुख दु:खाचे अमृत कुंभ रिचवले होते.... पण आता मात्र त्या सगळ्या गोष्टी मऊशार मखमली आवरणात वेष्टून हृदयाच्या कोंदणात खोलवर जपून ठेवण्याची वेळ आली होती. कारण पाचच दिवसांनी, म्हणजे दिनांक १ मे रोजी आम्ही आमच्या बाहरीनला 'मा सलामा' करणार होतो.



एरवी शुभ्रधवल हास्य करीत, प्रसन्नचित्ताने स्वागत करणारा माझा लाडका चाफा, आज बराचसा अबोल जाणवला. जाई जुई देखील एखाद्या अल्लड बालिकेसारखी फुरंगटून बसलेली भासली. मोगरा साफ मरगळलेला दिसला. अनंत तर माझ्याकडे मान वर करून सुद्धा पहायला तयार नव्हता. फारच हृदयद्रावक होते ते सारे...!

त्याचे कारण ही तसेच होते...! आजवर अनेक शुक्रवार आम्ही एकत्रीतपणे हसलो होतो... डोललो होतो... एकमेकांशी गोड सुसंवाद साधत हितगुज करत आलो होतो. कोजागिरीच्या पिठूर चांदण्यात चंदामामाची खिल्ली उडवताना तर त्यांनीच माझी साथ संगत केली होती. पण आज, सार्या गोष्टींकडे पाठ फिरवून, जड अंतःकरणाने मला त्यांचा दर्दभरी निरोप घ्यावा लागत होता.

अतिशय भारावलेल्या अवस्थेत मी त्यांच्या जवळ गेलो.... डोईवरून हलकेच हात फिरवला... आंजारले, गोंजारले.... प्रेमाची पखरण केली.... आणि काय चमत्कार...! क्षणात परिणाम दिसून आला....

त्यांना खूप बरे वाटू लागले होते. उराशी जपलेले औदासीन्य त्यांनी तडकाफडकी झटकून टाकले होते आणि त्या जागी त्यांच्या चेहऱ्यावर मंद स्मित तरळू लागले होते. पाहता पाहता अवतीभोवतीचे वातावरण आमुलाग्र बदलून गेले आणि मरगळीच्या जागी टवटवीत प्रफुल्लता फुलली.

दूर वरून विहरत येणारी मंद झुळूक तिच्या सुरेल शिळी द्वारे स्वर्गीय नाद लहरी छेडू लागली..... पक्षीगण आनंदाने बेभान होऊन नाचू लागले..... एखाद्या शांत डोहात बेधुंद सूर मारावा तसे रागिणीने ठेवलेल्या जल पात्रात ते यथेच्छ डुंबू लागले आणि पंख फडफडवून आपला निर्भेळ आनंद व्यक्त करू लागले. मोगरा त्याचे टपोरे गाल फुगवून माझ्याकडे पाहू लागला. जाईजुई शीतल नाद लहरींच्या तालावर लडिवाळपणे डोलू लागल्या. लाजरा अनंत तर चक्क मान वर करून गोड गोड स्मित करू लागला. एकूण सर्वांनीच समोर आलेल्या वास्तवाला आलिंगन दिले होते. आणि मनातील वैफल्य मनात दडवून साश्रू नयनांनी निरोप देण्याची सिद्धता केली होती.

माझ्या जिवाभावाच्या सग्या सोयर्यांनी दाखवलेले ते उत्कट प्रेम पाहून माझे मन खूप भारावून गेले. इथपावेतो आमच्यात चालू असलेला संवाद संपन्न होत आला होता. वातावरण धीरगंभीर बनले होते. इतक्यात माझे दोन्ही बाहू वर गेले आणि विजेच्या चपळाईने खाली येत मी त्या सर्वांना मानाचा कुर्निसात केला.... हे पाहून ते सारे शहारले.... त्यांच्या गालांवर कुंदकळ्या खुलल्या. खट्याळ वायू लहरींनी, ( आम्ही निघण्यास पाच दिवसांचा अवधी असताना देखील ) सायोनारा... ची धुन आळवायला घेतली. वातावरण अगदी सद्गदित होऊन गेले होते.

अखेरीस ती अमोघ मानवंदना मी स्वीकारली आणि दिवाणखान्यात प्रवेशलो.... पण, अस्वास्थ्य इतके दाटून आले होते की तिथल्याच एका बैठकीवर स्थानापन्न होत शून्यात दृष्टी लावून मी बराच वेळ विलाप करीत राहिलो.अशा तर्हेने इतक्या वर्षांचा सहवास आणि सुसंवाद आवरता घेतला गेला होता आणि प्रिय मायभूमीच्या कुशीत बागडणार्या नव्या सग्या सोयर्यांचे वेध मला खुणावू लागले होते.**

# दु:खाचा बाऊ

**जगी सर्व सुखी असा कोण आहे?**
**विचारे मना, तूची शोधुनी पाहे।।**
**समर्थ रामदासांच्या मनाचे श्लोकातला हा श्लोक सुपरिचित आहे. जगात सर्व सुखी कोण असू शकतो? विचार करणारे? सकारात्मक विचार करणारे मनच सुखी होऊ शकते. विचार-विवेकाने सुख जिंकावे. प्रश्नातच उत्तर आहे. दु:खाची जाणीव केव्हा होते? सुखाचा प्रवाह बंद झाला म्हणजे. म्हणजे दु:खापूर्वी सुख भोगलेले असते. मी सुखी का? मलाच इतके सुख का? असा प्रश्न माणूस स्वत: ला कधी विचारत नाही.**

निलेश साठे

माणूस बोलू शकतो म्हणजे तो आपल्या भावना कुठेही व्यक्त करू शकतो. निसर्गाने फक्त मानवालाच ही देणगी दिली आहे. मानवाला अस्तित्वापासून सुख आणि दु:ख यांचा सामना करावा लागला आहे . माणूस जस जशी प्रगती करत गेला तस तशी त्याने स्वत:साठी सुख साधने निर्माण केली. सुखाच्या हव्यासापोटी माणसाने इतकी काही प्रगती करून ठेवली आहे की चुटकीसरशी कुठली हि वस्तू उपलब्ध व्हावी. माणसाच समाधान कधी झालंच नाही. त्याला जे जे हवं ते तो मिळवत गेला. आणि अजूनही मिळवण्याच्या प्रयत्नामध्ये आहे. आज कोणतीही वस्तू घरबसल्या मिळू शकते त्यासाठी तुम्हाला बाहेर कुठेही जायची गरज नाही एवढी मानवाने प्रगती करून ठेवली आहे. परंतु, त्याचा परिणाम आता असा झाला आहे, की आत्ताची माणसाची पिढी ही आळशी बनत चालली आहे. सगळ्या सुख सुविधा बसल्या जागी मिळत असल्यामुळे नवीन काही निर्माण होत नाही. आणि त्यामुळेच की काय माणसाची शारीरिक क्षमता सुद्धा कमी होऊ लागलीआहे.

काबाड कष्ट करण्याची मानसिकता कमी होऊ लागली आहे. स्मार्ट वर्क च्या जमान्यात शारीरिक कष्ट आता नकोच वाटू लागले आहे. त्यामुळे जरा जरी काबाडकष्ट पडले तर माणूस चिडचिड करू लागतो. एखादं जादाच काम पडलं तर माणसाच्या तोंडून पहिला नकारच निघतो. अनेक कारणे तो सांगू लागतो. आज असं होत आहे आज तसं होत आहे यामुळे करू शकत नाही त्यामुळे करू शकत नाही. समोरचा करत नाही तर मी तरी का करू यातूनच मग स्पर्धा निर्माण झाली. तुझं दु:ख मोठं कि माझं दु:ख मोठं. आज माणसाची शारीरिक क्षमता कमी झाल्यामुळे साधा काटा जरी टोचला तरी माणूस तलवारीचा वार झाल्यासारखी प्रतिक्रिया देतो. आज प्रत्येक ठिकाणी प्रत्येक क्षेत्रात कामातून अंग बाजूला काढून घेण्याची प्रवृत्ती बळावली आहे . साधा ताप आला तरी माणूस कामाला जायचं टाळू लागला आहे. अंग दुखते म्हणून काही काम करणार नाही. कंटाळा आला म्हणून कामावर जाणार नाही. साधं फ्रेश वाटत नाही मूड नाही म्हणून सुद्धा काम टाळणारे अनेक लोक आहेत . तासंतास बिछान्यावर पडून फक्त आराम करतात. आराम हराम आहे हे कितीही ओरडून सांगा हे त्यांच्या डोक्यात घुसतच नाही.

पण काही लोक असेही आहेत की त्यांच्या डोक्यावर आभाळ कोसळलं तरी त्याला त्याच्याबद्दल 'ब्र' काढत नाहीत. कारण त्यांना माहित आहे की माणूस म्हटलं की सुखदु:ख हे येणारच. आणि या जगामध्ये सहनशक्तीच्या पलीकडचे कुठलेही दु:ख अस्तित्वात नाही. दु:खाचे प्रसंग सर्वांवर येतात. मग माझ्याच वाट्याला हे दु:ख का, असे वाटते. अशा माणसाचे सांत्वन करणे कठीण. ते ज्याचे त्याने करायचे. जीवनाकडे आणि जगाकडे उघड्या डोळ्यांनी पहायची सवय केली, थोडे अंतर्मुख होता आले की हे सुख-दु:खाचे तत्त्वज्ञान बसवता येते. जगात सुख-दु:खे दोन्ही आहेत. दोन्हीही भोगण्याची तयारी हवी.

जेवढे माणसाला सहन होईल पेलू शकेल एवढेच दु:ख देवाने निर्माण केले आहे. तरीसुद्धा माणूस दु:खाचा एवढा बाऊ करतो की आता त्याच्याने सहनच होणार नाही. अशी परिस्थिती निर्माण करतो. काही लोक दु:खाचा एवढा बाऊ करतात की देवाने फक्त मला दु:ख दिलआहे आणि दुसऱ्यांना खूप सुख दिल आहे. राईचा पर्वत करण्याची सवय माणसाला लागली आहे. सुखाचे आनंदाचे क्षण चटकन गिळून बसायचे आणि दु:ख त्रास व्यथा वेदना ह्या तासंताच दिवसेंदिवस चघळत बसायचे ही माणसाची सवय झाली आहे. आपले दु:ख दु:ख आहे आणि दुसऱ्याचे दु:ख मात्र काहीच नाही.

हि गोष्ट खरी आहे की जगातल्या प्रत्येक समस्येवर उपाय नाही परंतु आपले हातपाय व्यवस्थित आहेत आपण चांगलं कार्य करू शकत आहे तर लाखो लोकांपेक्षा तर आपण चांगलेच म्हणायचे असे सोडून फक्त दु:ख असेल तेवढेच त्याचाच गवगवा करायचा ही सुद्धा माणसांची एक सवय आहे. देवाने फक्त आपल्यालाच दु:ख दिल आहे असे म्हणून हाताश होणारे लाखो लोक या जगामध्ये आहेत. एखादे काम नाही झाले तर स्वत:ला दुर्दैवी समजतात . जे आपल्याजवळ नाही त्याच्यावर लक्ष केंद्रित करतात व जे आपल्याकडे आहे त्याच्याकडे दुर्लक्ष करतात. फक्त दु:खाचा पाढा वाचत बसतात. मग यातून बाहेर कसे पडायचे तर घराच्या बाहेर पडा फिरायला जा. बघा बाहेरचे जग किती सुंदर आहे. बाहेर फिरल्यामुळे इतरांचे सुद्धा सुखदु:ख समजतील. जगामध्ये बघा किती भयानक पेक्षा भयानक दु:ख आणि त्रास आहेत. कित्येक लोकांना दोन हात नाहीत कोणाला पाय नाही कुणाला डोळे नाही कुणाला कान नाही. कोणाला घालायला कपडे नाही तर कोणी भुकेने व्याकुळ झाला आहे. जेव्हा या लोकांचे दु:ख तुम्ही पहाल तेव्हा तुम्हाला तुमचा स्वत:च दु:ख कमी झाल्यासारखे वाटेल. त्यामुळेच तर एका गाण्याचे बोल आहेत दुनिया मे कितना गम है मेरा गम कितना कम है लोगो का गम देखा तो मै अपना गम भूल गया. पण त्यासाठी बाहेर पडलं पाहिजे. चार भिंतीच्या आत मध्ये बसून तुम्हाला जगाची ओळख नाही होणार. झटकून टाक जीवा दुबळेपणा मनाचा असं म्हणून कामाला लागायचं. रिकाम असं बसायचं नाही. सतत काही ना काहीतरी करत राहायच. फक्त चुकीचं आणि गलत काही होणार नाही याच्याकडे लक्ष ठेवायचं.दु:ख विसरून आनंदाचे क्षण गोळा करत राहायचं. काय व्हायचं ते होऊन जाऊ दे. रात्री मागून दिवस येणारच आहे तसं दु:खा मागून सुख येणारच आहे. त्या परमपित्या परमात्म्यावर विश्वास ठेवून पुढे चालत राहायचं. जे काही होईल ते चांगलंच होईल. असं म्हणून आपलं कार्य करत राहायचं. नुसतच दु:ख त्रास व्यथा वेदना कटकट हाल अपेष्टा यांना चिकटून बसायचं नाही.

दु:ख वाटल्याने कमी होतं असं म्हणायचे परंतु आज तशी परिस्थिती नाही. तुम्ही जेवढं दु:ख त्रास व्यथा वेदना यांना समोरच्याला ऐकवाल त्याच्यापेक्षा जास्त दु:ख त्रास व्यथा वेदना तुम्हाला ऐकवले जातील कारण समोरच्याला पण तर त्रास आहे. तो तुमच्यापेक्षा जास्त भयानक व्यथा मांडेल. व्यथा वेदनांचा बाजार मांडण्यापेक्षा सुखाचे आणि आनंदाचे क्षण गोळा करण्यातच खरी मजा आहे.

जगामध्ये एकही मनुष्य शंभर टक्के सुखी नाही. प्रत्येकाला काही ना काही तरी व्यथा वेदना ह्या आहेतच. पण जो दु:खाला कवटाळून बसतो त्याची कधीच प्रगती होत नाही. दु:खामधून बाहेर पडण्याचे हजार मार्ग आपण स्वत:हून शोधले पाहिजेत. तुमच्या दु:खावर फुंकर घालण्यासाठी कोणीही पुढे येत नाही. कारण प्रत्येकाला आपलं स्वत:चं दु:ख हे मोठं वाटत असतं. म्हणून तूच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार असं मनाला समजावत जीवनाला आकार देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कुठल्याही त्रासातून समस्येतून कटकटीतून बाहेर पडण्याचे आटोकाठ प्रयत्न करावेत. जेव्हा प्रयत्नांची पराकाष्टा केली जाते तेव्हा कुठून ना कुठून तरी आशेचा किरण सापडतोच. जगण्याची उमेद कधी सोडायची नाही. सरते शेवटपर्यंत लढत राहायचं. रिकाम्या हाताने आलो आहोत रिकाम्या हातानेच परत जाणार हे अंतिम सत्य आहे. कमाविण्याची जिद्द असावी गमावण्याची भीती नसावी. **

# पनवेलमध्ये धडाडल्या मविआ नेत्यांच्या तोफा

। पनवेल । वार्ताहर ।

लोकसभेच्या निवडणुकांचे वातावरण तापू लागले आहे. मावळ लोकसभा मतदारसंघात १३ मे रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर शनिवारी पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुदाम पाटील यांच्या पुढाकाराने कार्यकर्ता बूथ मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. स्वतःला संजोग वाघेरे पाटील समजून प्रत्येक काँग्रेस कार्यकर्त्यांनी जोरदार प्रचाराला लागण्याची शपथ या मेळाव्यामध्ये घेतली. महाविकास आघाडीतील प्रमुख पक्षाच्या नेत्यांची यावेळी मंचावरती उपस्थिती होती. विद्यमान खासदारांच्या निष्क्रिय कार्यप्रणालीवर यावेळी सर्वच वक्त्यांनी शब्दांचे कडक चाबूक ओढले.



पनवेलमधील काँग्रेसभवन येथील सभागृहात हा बुथ कार्यकर्ता मेळावा संपन्न झाला. शेकडोच्या संख्येने काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रचंड उत्साहात संपन्न झालेल्या या मेळाव्याला अप्रतिम प्रतिसाद लाभला. फटाक्यांच्या आतषबाजीमध्ये संजोग वाघेरे-पाटील यांचे मेळाव्यामध्ये स्वागत करण्यात आले. पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मल्लिनाथ गायकवाड यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर केले. या खेपेला अंगावर गुलाल पडलाच पाहिजे या विजीगिषू वृत्तीने कामाला लागा असे त्यांनी तमाम कार्यकर्त्यांना आवाहन केले. त्यानंतर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष कमांडर कलावत यांनी काँग्रेस पक्षाच्या जाहीरनाम्यातील न्याय योजना घरोघरी पोहोचविण्याचे तमाम बूथ कार्यकर्त्यांना आवाहन केले. त्यानंतर रायगडची मुलुख मैदानी तोफ समजले जाणारे ज्येष्ठ काँग्रेस नेते जी.आर. पाटील यांनी ओघवत्या शैलीत आपले मनोगत व्यक्त केले.

सुदाम पाटील यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित करताना म्हटले की, स्वतःला उमेदवार समजून घरोघरी प्रचार करा. आपण सगळ्यांनी मनामध्ये मशाल एके मशाल ही एकमेव निशाणीच पक्की केली पाहिजे. पंतप्रधान राहुल गांधी यांचे हात बळकट करण्यासाठी संजोग वाघेरे-पाटील यांना विजयी करायचे आहे. त्यासाठी प्रत्येकाने रात्रंदिवस एक केला पाहिजे, अशी भूमिका सुदाम पाटील यांनी मांडली. आर.सी घरत यांचे भाषण विशेष लक्षवेधी ठरले. ते म्हणाले की, प्रत्येकाने मान अपमान दूर ठेवून लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी या निवडणुकीत उतरले पाहिजे. उन्हाचा कितीही तडाखा असला, लग्न सराईची कितीही धावपळ असली तरी देखील निवडणुकीचे काम महत्त्वाचे आहे. आपल्याला आपली ताकद दाखवून द्यायची आहे. आपल्या भाषणात त्यांनी महानगरपालिकेच्या निर्मितीवर कडक ताशेरे ओढले. पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालय शेजारील इमारतींना जर पाणी देता येत नसेल तर असल्या भाजपावाल्यांना मते मागायचा अधिकार नाही, असे देखील ते म्हणाले.

रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र घरत यांनी आक्रमक शैलीत भाषण करताना संजोग वाघेरे-पाटील यांना खासदार केल्याशिवाय शांत बसणार नाही असा खणखणीत आवाज दिला. ते पुढे म्हणाले की, जर मोदी तिसरून सत्तेत आले तर यापुढे देशात निवडणुका होणार नाहीत. अत्यंत हुकूमशाही पद्धतीने चाललेल्या भाजपवाल्यांच्या कारभाराविरोधात जनता रस्त्यावरती उतरलेली आहे. भारत देश विरुद्ध मोदी असे या निवडणुकीचे स्वरूप झाले आहे. उरण विधानसभा मतदार संघ क्षेत्रामधून संजोग वाघेरे-पाटील यांना आम्ही कमीत कमी २५ हजार ते ५० हजाराची आघाडी मिळवून देऊ. उपस्थित काँग्रेस बूथ कार्यकर्त्यांना संबोधित करताना आ. बाळाराम पाटील म्हणाले की, अत्यंत दणदणीत मेळावा आयोजित केल्याबद्दल तुम्हा सगळ्यांचे आभार आणि तुम्ही जी वातावरण निर्मिती केली आहे त्याबद्दल तुमचे मनःपूर्वक अभिनंदन. हीच ऊर्जा आणि असाच उत्साह शेवटपर्यंत टिकवून ठेवा. अत्यंत उत्साहात, 'संजोग वाघेरे-पाटील तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है...' अशा घोषणांच्या दणकेबाज आवाजात सभागृह दणाणून गेले होते.

**विद्यमान खासदारांनी कुठल्याही प्रकारचे काम केले नाही. परंतु त्यांनी त्यांचा धनसंचय करण्याचे काम मात्र इमाने इतबारे केले आहे. २०१४ मध्ये त्यांची संपत्ती ६४ कोटी होती परंतु दहा वर्षानंतर त्यांच्या संपत्तीचा आकडा २६० कोटी इतका फुगलेला आहे. ५० खोके एकदम ओके हे आम्ही उगाच नाही म्हणत, असे संजोग वाघेरे-पाटील म्हणाले.**

> महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर स्थापन होण्यापूर्वी सर्वपक्षीय आघाडी करून जनताभिमुख राजकारण करण्याचा सगळ्यात पहिल्यांदा प्रयोग पनवेल तालुक्यात झाला. महाविकास आघाडीतील मित्र पक्षांमध्ये सुंदर समन्वय आहे. आम्ही एकोप्याने काम करत असतो. त्यामुळे महाविकास आघाडी मधील मित्र पक्षांचा इथला जोड हा फेविकॉल इतका मजबूत जोड आहे.
>
> – बाळाराम पाटील, माजी आमदार

> विद्यमान खासदारांनी दहा वर्षात किती कामे केली? मी त्यांना आव्हान देतो की त्यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये केलेले एक काम जाहीरपणे सांगावे. स्वाभिमानी विरुध्द गद्दार असेच या निवडणुकीचे स्वरूप आहे. दुसऱ्यांचे पक्ष तोडून फोडून केल्या जाणाऱ्या राजकारणामुळे येथील जनता पिचली आहे. मी आश्वासन देतो की मी जर खासदार झालो तर विभागनिहाय बैठका घेणार. संबंधित अधिकाऱ्यांसमवेत मित्र पक्षांच्या नेते पदाधिकारी कार्यकर्ते या सगळ्यांना त्या बैठकीत आमंत्रित करणार. जे-जे न सुटलेले प्रश्न आहेत ते सोडविण्यासाठी आणि समस्यामुक्त मतदारसंघ करण्यासाठी मी कटिबद्ध आहे.
>
> – संजोग वाघेरे-पाटील

## मतदार राजा जागा हो.. मतदारांना आवाहन करणाऱ्या रांगोळ्या

### निवडणूक आयोगाकडून रांगोळी स्पर्धा...

। नेरळ । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने सर्वत्र मतदार राजाला मतदान करण्याचे आवाहन केले जात आहे. त्याच माध्यमातून नेरळ परिसरातील मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान करावे यासाठी रांगोळीच्या माध्यमातून मतदारांना आवाहन करण्यासाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन केले होते. नेरळ येथील बापूराव धारप सभागृहात मोठ्या संख्येने रांगोळी कलाकारांनी रांगोळ्या काढून जनजागृती केली.



'माझे मत माझा अधिकार', 'मी मतदान करणारच' या घोष वाक्यांसह राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार नेरळ येथे मावळ लोकसभा मतदारसंघातील कर्जत विधानसभा मतदारसंघात मतदार जनजागृती मोहीम राबविण्यात आली. यावेळी मतदार राजाला आवाहन करणाऱ्या तसेच मतदानाचा अधिकार आणि लोकशाही मजबूत करण्यासाठी मतदान केले पाहिजे अशा आशयाचे मजकूर असलेल्या विविध प्रकारच्या रांगोळ्या कलाकारांनी काढल्या. त्यानंतर या रांगोळ्या पाहण्यासाठी खुल्या करण्यात आल्या असता मावळ लोकसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि कर्जतचे प्रांत अधिकारी अजित नैराळे आणि तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांनी रांगोळी प्रदर्शनाला भेट देउन राज्य निवडणूक आयोगाच्या कार्यक्रमाचे नेरळ मंडळ अधिकारी कार्यालयाने बजावलेल्या या स्पर्धेचे कौतुक केले.

## मुरूडमध्ये पोलिसांचे संचलन



**मुरूड :** आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुरूड तालुक्यातील राजपुरी, एकदरा, मुरूड शहर येथे शुक्रवारी सायंकाळी रूट मार्च घेण्यात आला. यामध्ये त्रिपुरा रिझर्व्ह पोलिसांसह ५० जवानांनी ठिकठिकाणी रूट मार्च अंतर्गत संचलन केले.

अलिबाग येथील उपविभागीय पोलीस अधिकारी विनीत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली मुरूड तालुका पोलीस निरीक्षक निशा जाधव यांच्या नेतृत्वाखाली राजपुरी गाव कोळीवाडा ते राजपुरी मोहल्ला, एकदरा गाव ते एकदरा पुलावरून मुरूड शहर बाजारपेठ मशीद आझाद चौक, पुरकर नाका, कोळीवाडा, पेठ मोहल्ला, लक्षीखार, दस्तुरी नाका मार्गे दत्तवाडी असा रूटमार्च घेण्यात आला. सॅपत्रिपुरा प्लाटून रिझर्व्ह फोर्सचे ५० जवान आणि मुरूड पोलीस उपनिरीक्षक अविनाश राठोड आणि पोलीस या रूटमार्च मध्ये सहभागी झाले होते.

## संजोग वाघेरे-पाटील यांचा उरण तालुक्यात गावनिहाय प्रचार दौरा

। चिरनेर । प्रतिनिधी ।

इंडिया आघाडी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, काँग्रेस, शेकाप, राष्ट्रवादी शरद पवार गट आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व समाजवादी पक्ष लोकसभेचे अधिकृत उमेदवार संजोग भिकू वाघेरे-पाटील यांचा उरण तालुक्याचा गावनिहाय प्रचार दौरा शनिवारी (दि.२७) व रविवारी (दि.२८) रोजी काढण्यात येणार आहे. या प्रचार दौऱ्याचे आयोजन उरण-पनवेल विधानसभा इंडिया आघाडी व महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे. तालुक्यातील प्रचार दौऱ्याच्या सुरुवातीला प्रथम जासई येथील हुतात्म्यांना अभिवादन करून प्रचार दौऱ्याला सुरुवात करण्यात येणार आहे.

या प्रचार दौऱ्यात शनिवारी जासई, एकटघर, रांजणपाडा, सुरूंगपाडा, धुतुम, चिरले, गावठाण, जांभूळपाडा, वेश्वी, दादरपाडा, दिघोडे, कंठवली, विंधणे, खालचापाडा, नवापाडा, धाकटीजुई, बोरखार, टाकी, मोठेभोम, चिरनेर, कळंबूसरे, मोठीजुई, आवरे, गोवठणे, पाले, पिरकोन, सारडे, वशेणी, पुनाडे, कोपाली, खोपटा असा प्रचार दौरा होईल. तर, रविवारी भेंडखळ, नवघर, कुंडेगाव, पागोटे, सोनारी, करळ, सावखार, जसखार, फुंडे, डोंगरी, पाणजे, बोकडवीरा, नवीनशेवा, काळाधोंडा, बालाई, तेलीपाडा, मुळेखंड, गणेशनगर, चाणजे, कासवलेपाडा, कोंढरी, बापदेव पाडा, सुरखीचापाडा, नवापाडा, करंजा, डाऊरनगर, काठेवाडी, नागांव, म्हातावली, केगाव, बोरी, मोरा, हनुमान कोळीवाडा, इमानदार नगर, इंदिरानगर आदी ठिकाणी प्रचार दौऱ्याचे नियोजन केले आहे. यावेळी मतदार नागरिकांच्या व कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी घेऊन, त्यांना इंडिया आघाडीची भूमिका नेतेमंडळी समजावून सांगणार आहेत. या प्रचार दौऱ्यात इंडिया आघाडीचे बबन पाटील, माजी आमदार बाळाराम पाटील, माजी आमदार मनोहर भोईर, महेंद्र घरत, प्रशांत पाटील, प्रीतम म्हात्रे, भूषण पाटील, तसेच तालुकास्तरावरील सर्व पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार आहेत.

## इंदापूर येथे मतदान जनजागृती

। माणगाव । सलीम शेख ।

लोकसभा निवडणुकीच्या निमीत्ताने इंदापूर येथे नुकतेच नवजीवन विद्यामंदिर तळाशेत व तळाशेत केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती व रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तळाशेत शाळेतून रॅलीला सुरुवात करून संपूर्ण इंदापुरात या रॅलीच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्यात आली.



सर्वांनी मतदान करावे तसेच मतदानाच्या पार्श्वभमीवर नवजीवन विद्यामंदिर विद्यालयातील विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले व मतदान करण्याचा संदेश देण्यात आला. कलाशिक्षक अजित भोपी यांनी या पथनाट्यात मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश ढेपे यांनी केले. सर्वांनी मतदान करावे यासाठी नवजीवन विद्यामंदिर तळाशेत येथील मुख्याध्यापक अशोक गावडे, शिक्षक अमोल गुरव, प्राजित पवार, विद्यालयातील शिक्षक, कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

## दिव्यांगानी मतदान करुन लोकशाही बळकट करावी

### शिवाजी पाटील यांचे आवाहन

। तळा । वार्ताहर ।

लोकशाही भक्कम करण्यासाठी मतदान करणे ही आपली जबाबदारी. दिव्यांगांनी न थकता न थांबता लोकसभा निवडणुकीत मागे न राहता १०० टक्के मतदान करून आपला सहभाग दर्शवून समाजापुढे आदर्श निर्माण करावा व त्यामुळे समाजातील लोकांचा आपल्याकडे बघून सहभाग वाढेल. तसेच, दिव्यागांसाठी भारतीय निवडणूक आयोगाने विविध सोयी सुविधा उपलब्ध करून दिले आहेत. जसे की दिव्यांगाना घरूनच मतदान, मतदान केंद्रावर व्हीलचेअरची व्यवस्था, रॅम रेलिंग, वाहनव्यवस्था तसेच दिव्यांगांना मदतनीसाची सोय केली असून आपण व इतरांनादेखील मदानाला प्रवृत करा, असे आवाहन सहकार्य अपंग कल्याणकारी संस्थेचे राज्य सचिव तथा ऑल स्पोर्ट्स असोसिएशन फॉर डिसेंबल्ड अँड रेहाबिलीटेशन महाराष्ट्र राज्याध्यक्ष शिवाजी पाटील यांनी केले.

तळा तहसील कार्यालय, नगरपंचायत व सहकार्य अपंग कल्याणकारी संस्था तळा यांच्या संयुक्त विद्यमाने तळा नगरपंचायत सभागृहात संपन्न झाला. यावेळी निवडणूक नायब तहसीलदार भारत जाधव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी किशोर पितळे, अमिश भौड, शिवाजी पाटील, दिनेश गुजराथी, तलाठी किशोर मालुसरे, तलाठी महाडिक, कोतवाल तेलंगे, अडखळले यांनी केले.



महागाईमुळे भाजपावर

## महिला संतप्त

**मुरूड :** राहुल गांधीं व सोनिया गांधी देश एकसंध ठेवण्यासाठी काम करीत आहेत. गांधी घराणे त्यागाची मूर्ती आहे. त्याग फक्त काँग्रेसचीच माणसे करू शकतात. तरीही मोदी व भाजप त्यांच्यावर नको ते आरोप करीत आहेत. हे चुकीचे आहे. राहुल गांधींना पंतप्रधान करण्यासाठी महाविकास आघाडीच्या अनंत गीते यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस ॲड. प्रविण ठाकुर यांनी नांदगावमध्ये बोलताना केले. वाढत्या महागाईमुळे त्रस्त असलेल्या महिलांना आपला संसार चालवितांना भाजपच्या राज्यात अक्षरशः नाकीनऊ येत आहेत म्हणून महिलांचा भाजपावर मोठा राग आहे, तो या निवडणुकीत दिसून येणार आहे. समाजाला व देशाला गरज असताना पक्ष सोडणे चुकीचे आहे असा टोला त्यांनी मुश्ताक अंतुले यांना लगावला.

## नेरळमध्ये मतदार जनजागृती रॅली

### अंगणवाडी सेविका,बचत गट सदस्य आणि नागरिक सहभागी

। नेरळ । प्रतिनिधी ।

मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा राजा हो, मतदान करा, लोकशाही बळकट करा.. अशा आशयाचे फलक घेउन मतदारांना आकर्षित करण्यासाठी रॅली काढण्यात आली. या रॅलीत नेरळमधील बचत गटांनी तसेच अंगणवाडी सेविका आणि नागरिकांनी सहभाग घेतला होता. तहसीलदार डॉ. शीतल रसाळ यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.



मावळ लोकसभा मतदारसंघातील कर्जत विधानसभा मतदारसंघात मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्याचे तहसीलदार डॉ. शीतल रसाळ आणि नेरळ पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांनी रॅलीला हिरवा झेंडा दाखवल्यानंतर रॅली मतदार राजाला आवाहन करणाऱ्या घोषणा देत पुढे निघाली. चावडी येथून निघालेली रॅली पुढे हुतात्मा हिराजी पाटील चौकातून माथेरान नेरळ रस्त्याने छत्रपती शिवाजी महाराज चौक अशी महावीर पेठ जुनी बाजारपेठ अशी बापूराव धारप सभागृह येथे पोहचली. तेथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान येथे रॅलीचा समरोप तहसीलदार डॉ. रसाळ यांनी मार्गदर्शनाने झाला. त्या आधी तहसीलदार यांनी रांगोळी स्पर्धेतील सहभागी कलाकार यांनी काढलेल्या रांगोळ्या यांची पाहणी केली.

हा सर्व कार्यक्रम नेरळ मंडळ अधिकारी कार्यालयाने तयार केला होता. त्यावेळी रॅलीचे संयोजन नेरळ मंडळ अधिकारी संतोष जांभळे यांनी केले होते. त्यांच्या मदतीला अरुण विषे, वैशाली पाटील, किरण बेलोस्कर, बाबासो शेकटे यांच्यासह तलाठी विकास गायकवाड, उमेश भोरे, अनिल कांबळे, वैशाली मानते, तलाठी माधुरी चौधरी, अशोक भगत, दिपक पेरणे, सुनिल गायकवाड, तसेच छगन फराट, दूंदा गायकवाड, अर्चना म्हसे यांचा सहभाग होता. या रॅलीमध्ये जिल्हा परिषदेचे माजी सदस्य नागो गवळी, परशुराम दरवडा, मधुकर गवळी तसेच अनेक नागरिक सहभागी झाले होते.

## रेवदंड्यात जनतेचा एकच नारा 'कहो दिलसे अनंत गीते फिर से'



। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड लोकसभेच्या निवडणुकीत महविकास आघाडी (इंडिया आघाडी) यांच्याकडून गावनिहाय प्रचाराचा नारळ शनिवारी (दि.२७) रेवदंडा ग्रामदैवत श्री. मारूती मंदिर पारनाका येथे वाढवण्यात आला. यावेळी नागरिकांनी रेवदंड्यात 'कहो दिलसे अनंत गीते फिर से' असा नारा दिला. तसेच, 'फक्त विजय नको, ऐतिहासिक विजय मिळवायचा' असा निर्धार केला.
इंडिया आघाडीचे कार्यकर्ते प्रचाराला जोमाने उतरले आहेत. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, रेवदंडा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सदाशिव (दादा) मोरे, रेवदंडा ग्रामपंचायतीचे सदस्य राजेंद्र वाडकर, खलील तांडेल, सलिम गोंडेकर, संतोष (बाबू) मोरे, सुरेश खोत, संदिप खोत, प्रमोद नवखारकर, मुजफ्फर मुकादम, हेमंत गणपत, शरद वरसोलकर, निलेश खोत, काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुरेश कोटकर, अशोक अंबुकर, आशिष गोंधळी, चौल ग्रामपंचायत उपसरपंच अजित गुरव, विभाग प्रमुख मारुती भगत, निलेश नाईक, तेजस शिंदे शिल्पा ठाकुर व चौल- रेवदंडा गावांतील इंडिया आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# समन्वयाने काम करा; मतदानाची टक्केवारी वाढवा

। रायगड । प्रतिनिधी ।

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीमध्ये रायगड लोकसभा मतदारसंघात मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे त्यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, अप्पर जिल्हाधिकारी सुनील थोरवे, रेवती गायकर, जोस्ना पाडियार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजीत बढे, निवासी उजिल्हाधिकारी संदेश शिर्के, उपजिल्हा निवडणूक अधिकारी स्नेहा उबाळे यांच्यासह विविध समित्यांचे नोडल अधिकारी उपस्थित होते.



जिल्ह्यातील शहरी भागाबरोबरच आदिवासीक्षेत्रातील मतदारांचे मतदान देखील महत्त्वाचे असल्याने याकडे लक्ष द्यावे. मोठी गावे, शहरांमधील गर्दीची प्रभागे येथे मतदारांची संख्या मोठी आहे. मागच्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा अधिक मतदान व्हावे, या दृष्टीने सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, असे डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी सांगितले.

### समितीनिहाय कामकाजाची माहिती सादर

यावेळी निवडणूक विषयक विविध समितीनिहाय कामकाजाची माहिती सादर करण्यात आली. जिल्हास्तरीय आदर्श आचारसंहिता कक्ष, मतदार जागृकता व सहभागिता कार्यक्रम (स्वीप), सी व्हिजील ॲप, सक्षम ॲप, ईव्हीएम, ८५ वर्षावरील ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग मतदार यांचे मतदान, पोस्टल मतदान व होम वोटिंग प्रक्रिया, इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र सरमिसळ प्रक्रिया, सूक्ष्म निवडणूक निरीक्षक प्रशिक्षणासह विविध बाबींची माहिती देण्यात आली. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी विधानसभा क्षेत्रनिहाय निवडणूक मतदान पूर्वतयारीबाबत माहिती सादर केली. निवडणुकीसाठी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी आवश्यक सुविधा पुरविण्याकडे लक्ष द्यावे. कायदा व सुव्यवस्था व पोलीस बंदोबस्त आराखडा निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार करण्यात यावा. मतदान जनजागृती, अधिकारी, कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाबाबतही निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे काटेकोर पालन करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

### स्ट्राँग रूम आणि मतमोजणी केंद्राची पाहणी

रायगड लोकसभा निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेण्यापूर्वी स्ट्राँग रूम आणि मतमोजणी केंद्राची पाहणी केली. यावेळी मतमोजणी केंद्र आणि स्ट्राँग रूमची सुरक्षा, पायाभूत सुविधा, पॉवर बॅकअप आणि त्या ठिकाणी असलेल्या इतर सुविधांच्या आढावा कल्याणकर यांनी यावेळी घेतला. कायदा व सुव्यवस्था व पोलीस बंदोबस्त आराखडा निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार करण्यात यावा. अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)